POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-६२ ● मुंबई, शनिवार,०४ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## सायबर फसवणूक झाल्यास विनाविलंब तक्रार द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
# सायबर फसवणूक तक्रारीसाठी 'गोल्डन अवर' महत्त्वाचा

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

रस्ता अपघातामध्ये ज्या पद्धतीने 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळाल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचू शकतात, तसेच सायबर फसवणुकीमध्येही 'गोल्डन अवर' महत्त्वाचा आहे. जेवढी विनाविलंब तक्रार द्याल, तेवढी फसवणूक झालेली रक्कम वाचविणे आणि परत मिळविणे सोयीचे होते. त्यामुळे सायबर फसवणूक झाल्याचे समजल्यास तातडीने विनाविलंब १९३० किंवा १९४५ या हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



'सायबर जनजागृती' माह ऑक्टोबर २०२५ कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस मुख्यालय येथे झाले. यावेळी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, अभिनेता अक्षय कुमार, अभिनेत्री राणी मुखर्जी, व्हीजेटीआयचे डॉ. फारूक काझी, 'आयआयटी' मुंबईचे प्रा. मंजेश हनवाल यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात सायबर गुन्हे टाळणे हेच सर्वात मोठ आव्हान आहे. गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगाराला शिक्षा होण्याबरोबरच आर्थिक तोटा टाळणे आवश्यक आहे. सायबर फसवणूक टाळण्यासाठी जनजागृती हा सर्वात प्रभावी उपाय आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे फिशिंग, ओटीपी फसवणूक, डीपफेक, आवाज व चेहरा क्लोनिंग अशा नवीन तंत्रांचा गैरवापर करून सामान्य लोकांना फसवले जात आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन व्यवहार, पेमेंट्स यामध्ये आपण माहिती देतो. कुकीज स्वीकारल्यानंतर वैयक्तिक माहितीचा गैरवापर होऊ शकतो. यावरून घोटाळे, खंडणी, सायबर बुलिंग यासारखे प्रकार घडतात.

राज्यात जागतिक स्तराची सायबर सिक्युरिटी लॅब, प्रतिसाद केंद्रे आणि रेग्युलेटरी यंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. यामुळे फसवणुकीनंतर तत्काळ कारवाई करून नुकसान कमी करता येते. मात्र, यासाठी वेळेवर तक्रार होणे महत्त्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानच धोका असून त्यावर तंत्रज्ञान हाच उपाय आहे. डीपफेकसारख्या आव्हानांवर आपली क्षमता वाढविणे गरजेचे आहे. कोणताही डिजिटल गुन्हा त्याचा डिजिटल फिंगरप्रिंट मागे ठेवतो. त्यामुळे क्षमता आणि जनजागृती दोन्ही समान महत्त्वाचे आहेत. युवकांपर्यंत सायबर सुरक्षिततेबाबत माहिती पोहोचवणे आवश्यक असून, या कार्यात कम्युनिकेटर्सची महत्त्वाची भूमिका आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला म्हणाल्या की, नागरिकांना सजग ठेवण्यासाठी आणि त्यांचे त्वरित संरक्षण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने उल्लेखनीय जनजागृती मोहीम सुरू केली आहे. देशातील प्रत्येक मोठ्या रेल्वे स्थानकावर दररोज सायबर सुरक्षा सूचना दिल्या जात आहेत. लाखो नागरिक हे संदेश दररोज त्यांच्या दैनंदिन जीवनात ऐकत आहेत. राज्य पोलीस यंत्रणाही जनजागृतीची गरज ओळखून महाराष्ट्रातील सर्व शहरे, जिल्ह्यांमध्ये आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सखोल जनजागृती मोहीम राबवत आहे.

यावेळी सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखविण्यात आला. तसेच 'सायबर योद्धा' या लहान मुलांसाठीच्या कॉमिक बुकलेटचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी सायबर यावेळी जनजागृतीसाठी काम करणाऱ्या सायबर वॉरियरचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. विशेष पोलीस महानिरीक्षक यशस्वी यादव यांनी आभार मानले.

## राज्यात ३९४ शाळांमध्ये एकही विद्यार्थी नाही, ग्रामीण भागांत स्थिती बिकट
# पुणे-मुंबईत धक्कादायक आकडेवारी समोर

■मुंबई । प्रतिनिधी,

शालेय शिक्षणमंत्री गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षणाची कास धरत असताना आणि शिक्षण विभागातील विविध घटक दरदिवशी नवनवीन उपक्रमांची सुरुवात करत असताना राज्यातील ग्रामीण भागांमध्ये शाळांची परिस्थिती बिकट होत असल्याचे चित्र आहे. 'यूडायस-प्लस'वरील ३० सप्टेंबरपर्यंतच्या नोंदणीच्या आकडेवारीनुसार, राज्यातील सर्व प्रकारच्या श्रेणींतील ३९४ शाळांमध्ये एकाही विद्यार्थ्याची नोंदणी झाली नसल्याचे समोर आले आहे. सुमारे आठ हजार शाळांची पटसंख्या दहाच्याही खाली आहे.

**ग्रामीण भागातील शाळा रिकाम्या होत असल्याचं प्रमाण चिंताजनक**

राज्यात एकूण दोन कोटी ११ लाख ८६ हजार ९४३ विद्यार्थ्यांची नोंद झाली. ही संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे सात हजारांनी अधिक आहे. मात्र त्याचवेळी पाच लाख विद्यार्थ्यांची नोंदणी अजूनही अपूर्ण आहे. त्यामुळे विद्यार्थीसंख्या लाखोंनी वाढेल, असे संकेत असले, तरी ग्रामीण शाळा रिकाम्या होण्याचे प्रमाणही चिंताजनक आहे.

**एकाही विद्यार्थ्याची नोंदणी नाही; ग्रामीण भागांत स्थिती बिकट**

'यूडायस-प्लस'वरील नोंदणीनंतर हाती आलेल्या आकडेवारीनुसार, पुण्यात सर्वाधिक ३७ शाळांत एकाही विद्यार्थ्याची नोंद झालेली नाही. रत्नागिरीतील २४, नागपूरमधील २३ शाळाही



विद्यार्थ्यांविना आहेत. बुलढाण्यात २१ शाळांत शून्य पटसंख्या आहे. या आकडेवारीनुसार रत्नागिरी जिल्ह्यातील तब्बल ७१३ शाळांची पटसंख्या १०च्या खाली आहे. पुण्यात ६२७, रायगडमध्ये ६८२, तर सिंधुदुर्गमध्ये ५६९ शाळांत एवढीच मोजकी विद्यार्थीसंख्या आहे.

मुंबई उपनगरांतील ३६०, मुंबई शहरातील ३४, ठाण्यातील १९९ आणि पालघरमधील १२४ शाळांतही विद्यार्थ्यांची संख्या १०च्या खालीच आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी २०० ते ३००, तर काही ठिकाणी १०० ते १५० शाळा अशा श्रेणीत आहेत. राज्यात एकूण सात हजार ९४६ शाळांत केवळ १ ते दहा विद्यार्थी नोंदले गेले आहेत.

**शहरनिहाय शाळा**

- मुंबई शहर - ५
- मुंबई उपनगर - २२
- ठाणे - १५
- पालघर - १९
- रायगड - १२

## कागदी बॉंडची झंझट संपली! आजपासून राज्यात ई-बॉंड
# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा महत्त्वाचा निर्णय

**ई बॉंड म्हणजे काय? त्याचे फायदे जाणून घ्या**

- महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत, National E-Governance Services Limited (NeSL) व National Informatics Centre (NIC) या संस्थांच्या तांत्रिक सहाय्याने कस्टम ई-बॉण्ड या प्रणालीचा आज शुभारंभ झाला.
- या नव्या प्रणालीमुळे आयातदार व निर्यातदारांना विविध व्यवहारांसाठी वेगवेगळे कागदी बॉण्ड देण्याऐवजी एकाच इलेक्ट्रॉनिक बॉण्डद्वारे सर्व प्रक्रिया पूर्ण करता येणार आहेत.
- हे बॉण्ड्स प्रोव्हिजनल असेसमेंट्स, एक्सपोर्ट प्रमोशन स्कीम्स, वेअरहाऊसिंग, आणि मॅन्युफॅक्चरिंग इन बॉन्डेड वेअरहाऊसेस इत्यादींसाठी वापरता येतील.
- ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल असून आयातदार/निर्यातदार ICEGATE पोर्टलवरून ई-बॉण्ड तयार करतील, तर ठीरछ द्वारे ई-स्टॅम्पिंग व ई-स्वाक्षरी होईल आणि अखेरीस कस्टम अधिकाऱ्याद्वारे ऑनलाईन पडताळणी होईल.
- मुद्रांक शुल्कासह सर्व शुल्काचे भरणे संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने केले जाणार आहे.
- महाराष्ट्र स्टॅम्प कायद्यानुसार निश्चित केलेले ५०० रुपयांचे शुल्क आता ऑनलाईन जमा करता येणार असून कागदी स्टॅम्पची आवश्यकता संपुष्टात येईल.
- आधार आधारित ई-स्वाक्षरी होईल. आयातदार/निर्यातदार तसेच कस्टम अधिकारी या दोघांच्या ई-स्वाक्षरीमुळे व्यवहार अधिक सुरक्षित व पारदर्शक असेल.
- कागदपत्रांची आवश्यकता पूर्णपणे दूर होऊन पर्यावरण पूरक दृष्टीने ह्यग्रीन गव्हर्नन्सह्लकडे हे मोठे पाऊल असेल.
- रिअल टाईम पडताळणीमुळे कस्टम अधिकाऱ्यांकडून तत्काळ पडताळणी व फसवणुकीस आळा घालता येईल.
- ई बॉंड मध्ये आधीच्या बॉण्डमध्ये आवश्यक ते बदल अथवा रक्कमवाढ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच करता येणार आहे.
- या प्रणालीमुळे सीमाशुल्क प्रक्रिया गतिमान होणार, व्यवसाय सुलभ होणार व शासनाच्या डिजीटल इंडिया तसेच एंशी ड्ढा ऊड्ढल्लॅ इ४२ल्ली२२ उपक्रमांना चालना मिळणार आहे.




■मुंबई । प्रतिनिधी,

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी इतर मंत्र्यांपेक्षा अत्यंत उजवी कामगिरी बजावली आहे. पाणंदमुक्ती असो वा काही जमिनीची हिस्सेवाटप मोजणीचे शुल्क असो कमी करण्याचे धाडसी निर्णय त्यांनी घेतले. इतरही अनेक योजना त्यांनी आणल्या. त्यांच्या या कामाच्या धडाक्याचे राज्यात कौतुक होत आहे. आपल्या कामातून वेगळी छाप टाकण्यात ते बेमालूमपणे यशस्वी झाले आहेत. आता त्यांनी कागदी बॉंड हद्दपार केले आहेत. त्याजागी आजपासून महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक बॉंडची सुरुवात करण्यात आली आहे. आयातदार व निर्यातदारांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

**राज्यात ई-बॉंडची सुरुवात**

राज्यात आजपासून इलेक्ट्रॉनिक बॉंडची सुरुवात झाली आहे. कस्टम अधिकाऱ्यांकडून तत्काळ पडताळणीमुळे फसवणुकीस ही आळा बसणार आहे. आधीच्या बॉण्डमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बदल किंवा रक्कम वाढ करणे शक्य होणार आहे. कस्टम अधिकारी व ग्राहकांच्या ई स्वाक्षरीमुळे व्यवहार अधिक सुरक्षित व पारदर्शक होणार आहे.

# नाशकात १२ पोलीस अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली, आयुक्तांनी काढला आदेश

■नाशिक । प्रतिनिधी,

नाशिकमध्ये पोलीस अधिकाऱ्यांची अचानक बदली करण्यात आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पोलीस आयुक्तांनी अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली केल्याने एकच खळबळ उडाली आहे. एकूण १२ अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली असून, यामध्ये सात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या बदलीमागे काही दिवसांपूर्वी तीन आमदारांनी घेतलेली भेट कारणीभूत आहे. जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारी संदर्भात तिन्ही आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती.

नाशिकमधील वाढत्या गुन्हेगारीला आळा बसवण्यासाठी आता पोलीस आयुक्त ॲक्शन मोडवर आले आहेत. १२ पोलीस अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. यामध्ये ७ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर त्यांची तडकाफकडी बदली करण्यात आली आहे.



तडकाफडकी बदली झाल्याने पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे.

**आमदारांनी घेतली होती मुख्यमंत्र्यांची भेट**

वाढत्या गुन्हेगारीसंदर्भात आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. वाढत्या गुन्हेगारी संदर्भात मंत्री दादा भुसे आणि स्थानिक भाजपाच्या तिन्ही आमदारांनी पोलीस आयुक्तांची भेट घेतली होती. त्यानंतरच ही बदली करण्यात आली आहे.

**ते १२ अधिकारी कोण? वाचा नाव**

- पोलीस निरीक्षक मधुकर शिवाजी कड - अंबड पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक जग्वेंद्रसिंग नवलसिंग राजपूत - गंगापूर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक मनोहर रामा कारंडे - अंबड पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक प्रकाश आत्माराम अहिरे - भद्रकाली पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक उमेश नानाजी पाटील - सायबर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक संतोष बबनराव नरुटे - मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक रणजित पंडीत नलवडे - सातपूर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक संजय मारुती पिसे - आडगांव पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक विश्वास रोहिदास पाटील - एमआयडीसी चुंचाळे पोलीस चौकी, नाशिक शहर
- म पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे - इंदिरानगर पोलीस ठाणे, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक तुषार मुरलीधर अढावु - शहर वाहतूक शाखा, युनिट क्रमांक १, नाशिक शहर
- पोलीस निरीक्षक रियाज ऐनुद्दीन शेख - सातपूर युनिट, शहर वाहतूक शाखा, नाशिक शहर

# सोलापूरचे जिल्हाधिकारी थेट बांधवार, पूरग्रस्त भागाची पाहणी, शेतकऱ्यांच्या वेदना घेतल्या जाणून

■मुंबई । प्रतिनिधी,

सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज माढा तालुक्यातील उंदरगाव. केवड, वाकाव या पूरग्रस्त गावांचा दौरा केला. ज्या ठिकाणी जाणं अशक्य होतं अशा ठिकाणी थेट ट्रॅक्टरमध्ये बसून ग्रामस्थांसमवेत आशीर्वाद यांनी बांधा बांधावर जाऊन पाहणी केली. सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ८८ गावांना या महापुराचा फटका बसला असून उभी पिके पूर्णपणे आडवी झाली आहे. अनेक ठिकाणी जमिनीची माती खरवडून वाहून गेलेली आहे या सर्व शेतीचे पंचनामे सध्या सुरू असून आठ ते नऊ ऑक्टोबर पर्यंत हे पंचनामे पूर्ण केले जाणार असल्याचे आशीर्वाद यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात जवळपास साडेचार लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके संपून गेली असून आता पंचनामे झाल्यावर नेमका आकडा समोर येईल असे त्यांनी सांगितले. केवड सारख्या गावात २०-२० फूट जमिनीला खड्डे पडले असून अशा ठिकाणी या शेतकऱ्याचे पुनर्वसन करण्याशिवाय



दुसरा पर्याय नसल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या पूरग्रस्त गावातील बाधित नागरिकांना धान्य, दहा हजार रुपयांची रोख मदत आणि पशुपालकांसाठी चारा व मुरघास याचे वाटप सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ४ हजार ५२१ बाधित पूरग्रस्तांना सुखरूप बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आले होते. वेळीच मदत पोहोचल्याने सोलापूर जिल्ह्यात एकही जीवितहानी झाली नसल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. सध्या चारा व मुरघास हा मोठ्या प्रमाणात संभाजीनगर सांगली कोल्हापूर पुणे या भागातून येत असून पशुपालकांना कुठेही चारा कमी पडणार नाही याची हमी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्यासोबत मोठ्या संख्येनं शेतकरी उपस्थित होते. सरकारनं आम्हाला तातडीने मदत करावी, आमचे पुनर्वसन करावं अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली आहे.

पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या वेदना सांगितल्या. आमचं पूनर्वसन करावं अशी मागणी देखील शेतकऱ्यांनी केली आहे. आमच्या जमिनी पूर्णत खरवडून गेल्या आहेत. १५ ते २० फुटांचे खड्डे जमिनीला पडले आहे. त्यामुळं यातून काही उत्पादन येण्याची अपेक्षाच नसल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. सरकारनं आम्हाला तोकडी मदत न करता भरीव मदत करावी, या संकटातून बाहेर काढावं अशा प्रकारची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# माओवाद मुक्त महाराष्ट्राच्या शक्यतेला जोरदार बळ, वरिष्ठ नक्षल कमांडर प्रस्तावाला पूर्ण पाठिंबा
## दंडकारण्यात माओवाद्यांमध्ये फुटीचे स्ट्रॉंग संकेत

■गडचिरोली। प्रतिनिधी,



काही दिवसांपूर्वी माओवाद्यांच्या सेंट्रल कमिटी तसेच पॉलिट ब्युरो सदस्य आणि अत्यंत वरिष्ठ नक्षल कमांडर मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ सोनू उर्फ भूपती याने एक पत्रक काढलं होतं. यात माओवाद्यांनी त्वरित आपले शस्त्र खाली ठेवून सरकारसोबत शस्त्रबंदी जाहीर करावी आणि शांतता वार्ता करावी, असा प्रस्ताव मांडला होता. त्याच्या काही दिवसानंतरच माओवाद्यांच्या केंद्रीय समितीच्या इतर सदस्यांच्या वतीने पत्रक काढत प्रस्ताव फेटाळून लावला. तसेच शस्त्रबंदी आणि शांतता वातार्चा सोनूचा प्रस्ताव त्याचा वैयक्तिक प्रस्ताव असल्याचे सांगत माओवाद्यांच्या संघटनेत सोनू एकटा पडल्याचे संकेत दिले होते. अशातच आता मात्र माओवाद्यांच्या गडचिरोली डिव्हिजनने एकत्रितपणे एक पत्रक काढत मल्लोजुला वेणूगोपाल उर्फ सोनूच्या प्रस्तावाला पूर्ण समर्थन देत प्रस्तावित शस्त्रबंदीला समर्थन दिले आहे. त्यामुळे माओवाद मुक्त महाराष्ट्राची शक्यतेला जोरदार बळ मिळाले आहे. तर माओवाद्यांच्या गडचिरोली डिव्हिजनसह गडचिरोलीत सक्रिय असलेल्या कंपनी १०चे सदस्य तसेच टेक्निकल टीमने सोनूच्या प्रस्तावाला पूर्ण पाठिंबा दिला आहे.

**गडचिरोली डिव्हिजनच्या एकत्रित पत्रकात नेमकं काय म्हटलं आहे?**

- केंद्रीय कमिटी आणि पॉलिट ब्युरो सदस्य कॉम्रेड सोनूच्या शस्त्रबंदी आणि शांतता वार्ताच्या प्रस्तावाला गडचिरोली डिव्हिजन कमिटी, गडचिरोली सक्रिय कंपनी 10चे सदस्य आणि टेक्निकल विभाग पूर्ण पाठिंबा देत आहे.
- गेल्या काही काळात माओवाद्यांचा क्रांतिकारक आंदोलन सातत्याने कमकुवत होऊन त्याची पीछेहाट होत आहे.
- देशातील कुठल्याच राज्यात माओवाद्यांचे क्रांतिकारक आंदोलन मजबूत होताना दिसत नाही आहे.
- गेल्या काही काळात माओवाद्यांना सातत्याने होणाऱ्या नुकसानमुळे आमच्यासारख्या खालच्या स्तरावरील कॅडरमध्ये आमच्या नेतृत्व संदर्भात त्यांच्या रणनीती आणि धोरण संदर्भात संशय आणि अविश्वास निर्माण झाला आहे.
- गेल्या काही महिन्यात माओवाद्यांनी जनरल सेक्रेटरी नंबाला केशवरावसह केंद्रीय समितीचे 8 सदस्य तसेच विविध राज्य समितीचे २० सदस्य सुरक्षा दलासोबतच्या संघर्षात गमावले आहे.
- अनेक दशकात निर्माण झालेले नेतृत्व अशा पद्धतीने नाहीसे होणे माओवाद्यांच्या खालच्या स्तरावरील कॅडर तसेच माओवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या लोकांच्या मनोबलाचा खच्चीकरण करणारे आहे.
- माओवाद्यांच्या नेतृत्वाचे सध्याचे धोरण आणि वर्तमान काळातील तरुण पिढी यांचे विचार यात साम्यता नाही, त्यामुळे तरुण पिढी विविध जन आंदोलनामध्ये उतरत असली, तरी सशस्त्र क्रांतिकारी आंदोलनामध्ये (जंगलातील सशस्त्र लढ्यासाठी) उतरण्यास तयार नाही.
- गडचिरोली डिव्हिजनमध्ये मागील काही वर्षात नवीन रिक्रुटमेंट होत नाही आहे. त्यामुळे गडचिरोली डिव्हिजन पूर्णपणे केंद्रीय कमिटीकडून पाठवल्या जाणाऱ्या त्यांच्या रंगरूट केंद्रीय समितीने पाठवलेले माओवादीवर अवलंबित आहे.
- त्यामुळे गडचिरोली डिव्हिजनला एकत्रितपणे असं वाटते की त्वरित शस्त्रबंदी करून संघर्ष टाळण्याशिवाय दुसरा कुठलाही मार्ग उरलेला नाही.
- गडचिरोली डिव्हिजनच्या या एकत्रित पत्रकावर गडचिरोली डिव्हिजनचा प्रवक्ता कमलसाय वेलादी याच्यासह गडचिरोली मधील कंपनी १०चा कमांडर निखिल तसेच गडचिरोली डिव्हिजनचा टेक्निकल टीमचा प्रमुख मैनू याच्या स्वाक्षऱ्या आहे.

# पुण्यात तब्बल ७० किलो चांदीची चोरी

■ नवी दिल्ली। प्रतिनिधी,



पुण्यातील गुरुवार पेठेतील तब्बल ४० वर्षे जुन्या असलेल्या सराफी पेढीवर चोरट्यांनी डल्ला मारुन तब्बल ७० किलो चांदीचे दागिने चोरी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पुण्यातील खडक पोलिसांनी एकाला उत्तर प्रदेशातून बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून ३६ किलो ४४२ ग्रॅम चांदी जप्त केली आहे. चोरी केलेली चांदी त्याने उत्तर प्रदेशातील त्याच्या घरी नेली होती. गुन्ह्यातील इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. राजेश महाराणीदिन सरोज (३६, रा. माघी चैनगड, थाना महेशगंज, ता. कुंडाख जि. प्रतापगड, उत्तरप्रदेश) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. १४ सप्टेंबर व १५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री चोरट्यांनी तीन पोती भरून ६७ लाख ६० हजार रुपये किमतीची ७० किलोहून अधिक दागिन्यांची चोरी केली. यात ६२ लाखांची चांदी तर ५ लाखांच्या रोकडचा समावेश होता. या चांदीनी भरलेली पोती (सिमेंटच्या गोणीच्या आकाराची) वाहून नेतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. तेव्हापासून पोलिस आरोपींच्या मागावर होते. घटनास्थळ व आजूबाजूच्या परिसरातील वेगवेगळ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून तांत्रिक तपास करण्यात आला.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## भाजपच्या हाताबाहेर जाणारी सांस्कृतिक शिस्त!



**भा**रतीय जनता पक्षाने २०१४ मध्ये कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा...या टॅगलाईनने एक जाहिरात आणली होती. या जाहिरातीने विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात धुमाकूळ घातला. सर्वांच्या ओठांवर ही जाहिरात होती. महाराष्ट्रातील गरीबी, बेरोजगारी, साठमारी, महिला अत्याचार, राजकीय लूटमार, अशा विविध समस्यांना स्पर्श करत, भाजपने ही जाहिरात बाजारात आणली होती. आता अकरा वषानंतर भाजपलाच कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा, असं विचारण्याची वेळ आली आहे. भाजपचे काही आमदार आणि मंत्री यांची सार्वजनिक सभा आणि माध्यमातील सध्याची भाषणे ऐकल्यावर आणि पाहिल्यावर याचसाठी भाजपला सत्ता पाहिजे होती का, असा प्रश्न पडतो. जतचे भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यातून विस्तव जात नाही. नुकत्याच झालेल्या दसरा मेळाव्यात पडळकरांनी पुन्हा एकदा जयंत पाटलांविरोधात असंसदीय भाषेचा वापर केला. पडळकरांनी जयंत पाटील यांचा फक्त एकेरी भाषेतच उल्लेख केला नाही तर जयंत्या म्हणत त्यांच्यावर टीका केली. प्रत्येक सभेत जयंत पाटील यांच्यावर वैयक्तिक टीका केली जात आहे. पडळकरांचा जयंत पाटील यांच्या राजकारणाला असलेला विरोध समजू शकतो. तो त्यांनी करावा, तसा त्यांना अधिकार आहे. मात्र एका ज्येष्ठ राजकारण्याचा, नेत्याचा एकेरी उल्लेख, त्यांच्या वडिलांचे नाव घेऊन त्यांच्यावर केली जाणारी टीका, या सगळ्यामुळे महाराष्ट्राची राजकीय संस्कृती प्रदूषित होत आहे, याचा विचार भाजपच्या नेतृत्त्वानेही करण्याची गरज आहे. फक्त पडळकरच नाहीत, आणखी काही आमदार आणि मंत्रीही अशा वक्तव्यांमुळे वातावरण बिघडवत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे वारंवार सांगत असतात की, पडळकरांच्या बोलण्याचा तसा अर्थ नाही. त्यांच्या मनात तसे काही नाही. मात्र धनुष्यातून निघालेला बाण आणि मुखातून निघालेले शब्द हे मागे फिरत नाहीत, त्यांनी केलेला घाव मनात खोलवर झालेला आसतो. या जखमा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बावनकुळेंच्या शाब्दिक फुंकरणे बर्‍या होर्णाया नसतात. जयंतराव पाटील ही राजाराम बापूंची औलाद वाटत नाही, हे पडळकरांचे एका भाषणातील शब्द आहेत. दसरा मेळाव्याच्या भाषणात त्यांनी जयंतराव, तुझ्या कितव्या बायकोचं मंगळसूत्र मी चोरलं? असा सवाल केला. त्यानंतर जयंत्या... म्हणत हल्ला चढवला. ही भाषा महाराष्ट्राच्या राजकारणाला नक्कीच शोभणारी नाही. पडळकर ज्या पक्षाचे सध्या प्रतिनिधीत्व करतात तो पक्ष कधीकाळी 'पार्टी विथ डिफरन्स' म्हणून ओळखला जात होता. मात्र भारतीय जनता पक्षानेही आता सर्व साधनसुशिता सोडलेली आहे. वाजपेयी, अडवाणी, जेटली, सुषमा स्वराज यांचा भाजप आणि २०१४ नंतरचा भाजप यात ३६० कोनात फरक पडलेला आहे, हेही मान्यच. आज भाजपचे नेतृत्त्व नरेंद्र मोदी आणि अमित शहांकडे आहे. या नेत्यांची विरोधकांबद्दलची भाषा देखील संसदेच्या कोणत्याही आचारसंहितेत बसणारी नसते. हा भाषेचा घसरता स्तर आहे की, नेत्यांच्या वैचारिकतेचा, हा आता संशोधनाचा विषय झाला आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाला २७ सप्टेंबर २०२५ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. संघाचा शताब्दी सोहळा नागपूरपासून देशभरात साजरा होत आहे. भारतीय जनता पक्षाची ही मातृसंस्था. संघाने १९२५ मध्ये लावलेल्या रोपट्याला आज ९०, ९५, १०० वर्षानंतर फळे आली आहेत. शिक्षण, संधी, सत्ता, संपत्तीपासून दूर राहिलेल्या वंचित, शोषित, आदिवासी, बहुजन समाजापर्यंत पोहोचून त्यातून नेतृत्त्व उभं करायचे काम संघाने गेल्या काही दशकांमध्ये सचोटीने केले. यासाठी संघाच्या अनेक पिढ्यांनी काम केले. त्यांची नावेही आज अनेकांना माहीत नसतील. महाराष्ट्रात भाजपला फक्त हिंदुत्वाच्या मुद्यावर सत्तेवर येता येणार नाही, हे लक्षात आल्यानंतर ८०च्या दशकात वसंतराव भागवतांनी 'माधव' फॉर्म्यूला महाराष्ट्राच्या राजकारणात आणला. मराठा समाज प्रभावशाली असलेल्या महाराष्ट्रात बहुसंख्येने असलेला माळी, धनगर, वंजारी समाजाला एकत्र करुन त्यांना भाजपसोबत जोडण्याचे काम भागवतांनी केले. त्यांच्या माधव फॉर्म्युल्याचे पहिले फलित राहिले गोपीनाथ मुंडे. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, पांडुरंग फुंडकर, एकनाथ खडसे आणि महादेव शिवणकर या सारखे नेते त्याकाळात निर्माण झाले. गोपीनाथ मुंडे राज्याच्या उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले. ओबीसी समाजाला संघ-भाजपासोबत जोडण्याची ही रणनीती किती यशस्वी ठरली हे गेल्या दीड, दोन दशकात महाराष्ट्रासोबतच देशाने पाहिले आहे. गोपीनाथ मुंडे यांचा पहिला हल्ला हा शरद पवारांवरच असायचा. प्रस्थापित नेतृत्त्वावर हल्ला करुनच ओबीसींचे नेतृत्त्व उभे राहू शकते. ओबीसी, वंचित, आदिवासींना सोबत घेऊन संपूर्ण सत्ता मिळवता येऊ शकते, हे भाजपने ओळखले. त्यातून आता पडळकरांसारखे नेते पुढे आणले जात आहेत. गोपीनाथ मुंडेंनी शरद पवारांवर सातत्याने हल्ले चढवले असले तरी वैयक्तिक पातळीवर जाऊन, त्यांच्या कुटुंबापर्यंत जाऊन कधीही टीका केली नाही. भाषेची, सभ्यतेची, सुसंस्कृतपणाची सीमारेषा या नेत्यांनी ओलांडली नाही. राजकीय पातळीवर एकमेकांवर गाडीभर आरोप करणारे हे नेते वैयक्तिक आयुष्यात मात्र माणुसकी जपत होते. मुंडेंना सहकारी साखर कारखाना उभा करायचा तेव्हा विलासराव देशमुखांनी मदत केली होती. देशमुख आणि मुंडे हे एकमेकांचे विरोधी नेते एकाच मंचावर आल्यानंतर त्यांच्या भाषणातील जुगलबंदी पाहणे पर्वणी ठरायचे. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्यातील राजकीय विरोध टोकाचा, मात्र वैयक्तिक आयुष्यापर्यंत त्यांनी तो कधी येऊ दिला नाही. पडळकरांचे राजकारणच पवार कुटुंबावरील टीकेपासून सुरू होते. शरद पवारांवर त्यांच्या शारीरिक व्यंगावर अतिशय खालच्या पातळीवर टीका करणे. सुप्रिया सुळे, त्यांचे पती आणि राजकारणाशी संबंध नसलेल्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींवर केलेले आरोप कोणालाही पटणारे नाहीत. अजित पवार आता महायुतीचा भाग आहेत म्हणून त्यांच्यावरील हल्लाबोल थांबला आहे. अन्यथा पडळकरांच्या रडारवर बारामतीचे सगळेच पवार कायम असतात. या टोकाच्या पवार विरोधातूनच त्यांनी बारामतीमधून निवडणूकही लढवली होती. पण त्यांना राजकीय यश मिळाले ते भाजपच्या तिकिटावर जत विधानसभेतून. विधान भवनात आमदार गोपीचंद पडळकर आणि शरद पवारांचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली फ्री स्टाईल अवघ्या महाराष्ट्राने पाहिली. विधान भवनात अशी मारामारी होणे हे कोणत्याच सरकारला शोभनीय नाही, मात्र त्यानंतरही भाजपने पडळकरांना वेसण घातलेली दिसली नाही. तेव्हाच त्यांना अटकाव केला गेला असता, योग्य समज भाजपमधील वरिष्ठ नेत्यांकडून आणि सांस्कृतिकता जपण्याचा दावा करर्णाया संघाकडून देण्यात आली असती तर आता गावागावात जाऊन त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाची लक्तरे अशी वेशीवर टांगली नसती. गोपीचंद पडळकरांचा स्वभाव मुळात बंडखोर. शिक्षकाचा मुलगा असलेले पडळकर यांची राजकीय इच्छाशक्ती मोठी आहे. एका शिक्षित कुटुंबात ते वाढले आहेत. त्यामुळे सध्या ते वापरत असलेली भाषा ही त्यांची उपजत असण्यापेक्षा त्यांनी विकसित केलेली असण्याची शक्यता अधिक आहे. का त्यांना अशी भाषा वापरण्यासाठी जाणीवपूर्वक सांगितले जात आहे, अशीही शंका येते. राष्ट्रीय समाज पक्षात पडळकरांचा राजकीय जन्म झाला. महादेव जानकरांसोबत त्यांनी राजकारणातील बाराखडी गिरवली. मुळातच बंडखोर असलेले गोपीचंद पडळकरांचे जानकरांसोबत फार काळ जुळले नाही. जानकरांसोबत राहून बहुजन समाजाचे प्रश्न आणि महत्त्व त्यासोबतच त्यांच्या राजकीय आकांक्षा त्यांनी हेरल्या. २००९ मध्ये सांगली जिल्ह्यातील खानापूर आडपाडी विधानसभा मतदारसंघाची निवडणूक गोपीचंद पडळकरांनी राष्ट्रीय समाज पक्षाकडून लढली. तेव्हा त्यांचे वय अवघे २७-२८ वर्षांचे असेल. १९९० पर्यंत हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला होता. २००९ मध्ये काँग्रेसकडून तत्कालीन विद्यमान आमदार सदाशिवराव पाटील उमेदवार होते. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची तेव्हा आघाडी होती. १९९९ ला आमदार असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल बाबर यांनी बंडखोरी केली. या दोन्ही प्रस्थापित उमेदवारांच्याविरोधात नवखे पडळकर राष्ट्रीय समाज पक्षाकडून मैदानात उतरले होते. त्यांना या पहिल्याच निवडणुकीत १९,०२४ मते मिळाली. अनिल बाबर यांचा २,९८९ मतांनी पराभव झाला. सदाशिवराव पाटील सलग दुसऱ्यांदा विजयी झाले. बाबरांनी त्यांच्या पराभवाचे खापर गोपीचंद पडळकर यांच्यावर फोडले आणि त्यातूनच बाबर आणि पडळकर असा संघर्ष सुरू झाला. या संघषार्तूनच पडळकरांसह आठ जणांवर मंगळसूत्र चोरीचा आरोप करण्यात आल्याचे सदाभाऊ खोत यांनी संभागृहात सांगितले आहे. हा आरोप एका राजकीय कटाचा भाग असल्याचेही ते सांगतात. मात्र या आरोपातून कोटार्ने निर्दोष सोडलं असतानाही त्यांना त्यावरुन आजही डिवचलं जातं, यामुळे त्यांचा उद्रेक होतो असं सदाभाऊ खोतांनी म्हटलं होतं. पूर्वायुष्यातील एखाद्या कारणाने बहुजन समाजातील नेत्याला डिवचत राहणे हेही चुकीचे. मात्र पडळकर आणि इतर नेत्यांकडून वापरली जाणारी भाषा त्यामुळे समर्थनीय होत नाही. त्यामुळे भाजप आणि शताब्दी महोत्सव साजरा करर्णाया संघाने अशा नेत्यांना काहीही न बोलणे, म्हणजे त्यांच्या या कृतीला, भाषेला एक प्रकारे समर्थन देणेच आहे. भाजप आणि संघानेच आता ठरवले पाहिजे की, राजकारणाचा, समाजाचा, भाषेचा स्तर आणखी किती रसातळाला न्यायचा.

## पाकिस्तानला हलक्यात घेणे कितपत फायद्याचे?

**आपला शेजारी कंगाल आहे, महागाईचा आगडोंब तेथे उसळला आहे, आपल्यापेक्षा त्यांची अर्थव्यवस्था अतिशय किरकोळ आहे, असे म्हणून पाकिस्तानला आपण खूपच हलक्यात घेत आहोत. मात्र, हे योग्य आहे का?**



भारतात साखरेचा दर एका किलोला ४० ते ५० रुपये आहे, तर पाकिस्तानात १७५ ते १८० रुपये आहे, तर भारतात ५५ ते ८५ रुपये प्रति लिटर भावाने विक्री होणारे दूध पाकिस्तानात २२० ते २५० रुपयांना आहे. तसेच, भारताची अर्थव्यवस्था ही जगात चौथ्या क्रमांकाची असून भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) ३.६४ लाख डॉलर एवढे आहे, तर पाकिस्तान जगात ३८व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असून त्यांचा जीडीपी ३७ हजार डॉलर एवढा आहे. म्हणजे आर्थिक पातळीवर भारत आणि पाकिस्तान यांची तुलना होऊ शकत नाही. तसे पाहता दोन्ही देश एकाचवेळी स्वतंत्र झाले, पण गेल्या साडेसात दशकांत दोन्ही देशांच्या वाटचालीत कमालीचा फरक आहे. ही वस्तुस्थिती मान्य करायलाच हवी.

पाकिस्तानला भीकेचे डोहाळे लागले आहेत, दारिद्र्य आणि कर्जबाजारीपणाने पाकिस्तान पूर्णपणे सडला आहे, अमेरिका व चीनसारख्या देशांच्या आश्रयाखाली तो आहे, तेथे पारदर्शक लोकशाही नाही, लष्कराचा तेथे वरचष्मा आहे, तेथील राजकीय नेते सर्वसामान्यांना काहीच विचार करीत नाहीत, दहशतवाद्यांना तो पूर्णपणे बळ पुरवत आहे, नजीकच्या काळात पाकिस्तानचे तुकडे होतील, कदाचित पाकिस्तान नामशेषही होईल या आणि अशा कितीतरी वदंता आणि संदेशांची सोशल मीडियात चलती आहे. यात तथ्य नक्कीच आहे. मात्र, भारताने नेहमीच पाकिस्तानला अत्यंत कमी लेखणे योग्य नाही. भारताच्या परराष्ट्र धोरणात पाकिस्तान हा महत्त्वाचा भाग राहिला आहे, यापुढेही राहील. मात्र, तुलना करून आपण पाकिस्तानकडे कानाडोळा करीत आहोत, असे व्हायला नको.

जगात एकूण ५७ मुस्लिम राष्ट्रे आहेत. सद्यस्थितीत या देशांमधील लोकसंख्या २ अब्ज एवढी आहे. जागतिक लोकसंख्येच्या तुलनेत ही टक्केवारी २५ एवढी आहे. अरब राष्ट्रांना लागून असलेला पाकिस्तान हा मुस्लिम देशांपैकी एक आहे. भूराजकीयदृष्ट्या पाकिस्तानचे जगातील स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

दक्षिण आशियातील देश आणि युरोपला जोडणाऱ्या देशांशी असलेली सीमा हे भौगोलिक स्थान पाकिस्तानच्या पदरात अनेक बाबी टाकणारे आहे. (म्हणूनच अमेरिकेला पाकिस्तान हवा असतो.) पृथ्वीच्या पाठीवरील पाकिस्तानच्या या महात्म्याकडे आपण डोळेझाक करू शकत नाही. त्यामध्ये अनेक दोष असतील, पण भारताने सतत त्याची हेटाळणी करणे योग्य नाही. कारण, गेल्या काही महिन्यांमधील घडामोडी पाहता पाकिस्तानबाबत आपण अधिक सजग रहायला हवे तसेच त्याच्याकडून योग्य तो धडाही घ्यायला हवा.

भारतावर दहशतवादी हल्ले करणाऱ्यांमागे पाकिस्तान भक्कम उभा राहतो ही काळ्या दगडावरची रेघ आहे. मुंबई हल्ला असो की संसद किंवा पुलवामा की पहलगाम. साऱ्यांमागे पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादच राहिला आहे. भारताने वेळोवेळी सडेतोड उत्तर दिले असले तरी त्यामुळे पाकिस्तानचे फार काही बिघडले आहे असे चित्र नाही. उलट भारताविरोधात कागाळ्या करण्यात तो माहीर आहे. शिवाय भारतावरील हल्ले कुठे कमी झालेले नाहीत. संधी शोधून आणि ठराविक अंतराने ते घडवून आणले जातात. असा उपद्व्यापी पाक हा 'ऑपरेशन सिंदूर'मुळे फार अडचणीत येईल असे अनेकांना वाटले. भलेही पाक लष्कराच्या विनंतीवरून भारताने हे ऑपरेशन स्थगित केले असेल, पण पाकिस्तानने गेल्या काही महिन्यांत ज्या बाबी केल्या आहेत त्या दुर्लक्षित करता येणाऱ्या नक्कीच नाहीत.

भारताने 'ऑपरेशन सिंदूर'नंतर जगभरात खासदारांची शिष्टमंडळे पाठवली. देशोदेशी पाकचे दुष्कृत्य उजागर केले. त्याने भारताला विशेष फायदा झाला असे जराही म्हणता येणार नाही. तसेच पाकचे काहीही वाकडे सुद्धा झालेले नाही. याउलट पाकचे पारडे अधिक झुकते आहे का, अशी शंका निर्माण होते. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान आणि त्यानंतर काय काय घडले याची उजळणी केली तर काही बाबी ठळकपणे समोर येतात त्या अशा-

१.आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून जवळपास अडीच अब्ज डॉलरचे कर्ज पाकला मंजूर झाले.
२.संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत पहलगाम हल्ल्याचा मुद्दा गेला नाही.
३.पाकने तुर्की व चीनकडून भक्कम पाठिंबा मिळवला. त्यांनी दिलेली शस्त्रास्त्रे भारताविरोधात वापरली.
४.मुनीर हे चाणाक्ष निघाले. त्यांनी चीन व तुर्कीच्या शस्त्रास्त्रांची जणू चाचणी भारताविरोधात करून घेतली.
५.पाकने पारंपरिक ऐवजी आधुनिक स्वरूपाचे हल्ले केले.
६.ठार झालेल्या दहशतवाद्यांचे अंत्यसंस्कार शासकीय इतमामात केले.
७.वेगवेगळे नरेटिव्ह पसरवून पाकने जगभरात प्रसिद्धी मिळवली.
८.मुनीर हे फील्ड मार्शल बनले.
९.अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकला अधिक जवळ केले. त्यांना गोंजारले. मुनीर यांच्यासोबत डिनर केला.
१०.एकाही देशाने पाकिस्तानचा निषेध केला नाही की त्याला दोष दिला नाही किंवा पाकवर निर्बंध लादले नाहीत. केवळ पहलगाम हल्ल्याचा निषेध करण्यात आला.
११.संयुक्त राष्ट्राच्या दहशतवादविरोधी समितीचे अध्यक्षपद पाकला मिळाले.
१२.चीनने भव्य सोहळ्यासाठी पाकला आमंत्रित केले.
१३.राष्ट्रपती झरदारी हे तब्बल दहा दिवसांच्या चीन दौऱ्यावर गेले. त्यांना अत्याधुनिक क्षेपणास्त्र आणि चीनची संरक्षण सज्जता तसेच ताकद दाखविण्यात आली.
१४.पाकने सौदी अरेबियासोबत सामरिक करार केला. दोघांपैकी एका देशावर हल्ला झाला तर तो दोघांवर हल्ला समजून प्रत्युत्तर दिले जाईल, असे त्यात नमूद करण्यात आले.
१५.पंतप्रधान शरीफ आणि लष्कर प्रमुख मुनीर यांचे व्हाईट हाऊसमध्ये आगतस्वागत करण्यात आले.

वरील सर्व बाबी लक्षात घेता पाकिस्तानची बाजू जागतिक पातळीवर कुठेच कमी पडताना दिसत नाही. उलट ते स्वतःची बाजू भक्कम करीत आहेत. भारताला मात्र अनेकानेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अमेरिकेने लादलेल्या आयात शुल्काचा प्रश्न दिवसागणिक गंभीर होतो आहे. एच१बी व्हिसावरही भरभक्कम शुल्क लावून ट्रम्प यांनी भारताला लक्ष्य केले आहे.

पाकिस्तानला आपण कितीही हलक्यात घेत असलो तरी ना त्यांचे कंबरडे मोडते आहे की त्यांना काही झळ पोहचते आहे. पाककडून मात्र भाराविरोधात जोरदार आघाडी उघडण्यात आली आहे. भारताला अडचणीत आणण्यासाठी ते रणनीती आखत आहेत. बांगलादेशशी असलेले शत्रुत्व संपून आता पाकसोबत मित्रत्वाचे नाते निर्माण झाले आहे. ही सुद्धा त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. म्हणजेच, पाक एक एक पायऱ्या पुढे तर जात नाही ना याची खातरजमा करण्याची वेळ भारतावर आली आहे.

सार्कसारखी संघटना जवळपास बंद पडल्यासारखी आहे. भारताचा दक्षिण आशियातील दबदबा वाढतो आहे की कमी होतो आहे, याचाही विचार करायला हवा. केवळ आर्थिक बाबतीत पाकशी तुलना करून आपण मोठे आहोत असे म्हणून आपली पाठ थोपटून घेणे संयुक्तिक नाही. अमेरिका आणि चीनचे मोठे आव्हान भारतासमोर आहे. त्यातच आता पाकिस्तानसुद्धा भारतासमोर अडथळे निर्माण करतो आहे. पाकिस्तान न बोलता अनेक कृती करून भारतापेक्षा वरचढ तर बनत नाही ना, जगभरात आपली प्रतिमा उज्ज्वल तर करीत नाही ना, या साऱ्यावर अतिशय बारकाईने लक्ष ठेवणे अगत्याचे आहे. खरे तर भारतीय परराष्ट्र धोरणासमोरच पाकने आव्हान उभे केल्याचे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. त्यामुळे शत्रू राष्ट्र पाकला कमी लेखून किंवा त्याला हलक्यात घेऊन भारत फार काही साध्य करणार नाही. पाकच्या कुटील कारवाया आणि कुरापतींना शह देण्यासाठी भारताने सर्वंकष असे धोरणच आखण्याची नितांत गरज आहे.

## एआयच्या फायदे तोट्यांबद्दल बोलू काही

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि विशेषतः चॅटजीपीटीसारख्या मोठ्या भाषा मॉडेल्स यांनी आजच्या काळात कार्यस्थळ आणि शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवली आहे. अमेरिकेतील प्रख्यात अशा एमआयटी मीडिया लॅबनं नुकताच केलेला एक अभ्यास 'युअर ब्रेन ऑन चॅटजीपीटीः अक्युमुलेशन ऑफ कॉगनिटीव्ह डीबेट वेन युजिंग ॲन एआय असिस्टंट फॉर एसे रायटिंग टास्क' यामध्ये एआयचा कार्यस्थळावरील प्रभाव आणि त्याच्या दीर्घकालीन परिणामांचा शोध घेतला आहे. या अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, एआयचा वापर उत्पादकता वाढवतो, परंतु त्याचवेळी सृजनशीलता, स्मरणशक्ती आणि स्वतंत्र विचार करण्याच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊ शकतो. या अभ्यासानं जगभर खळबळ उडाली आहे. म्हणूनच सदर लेखात आपण एआयवर पूर्णपणे विसंबून राहण्याचे फायदे आणि तोटे याचा ऊहापोह करू या. प्रत्येक गटानं निबंध लेखनाची तीन सत्र पूर्ण केली. काही सहभागी विद्यार्थ्यांनी शेवटच्या सत्रात गट बदलून लिहिलं. लेखनाच्या वेळी ३२ चॅनेल ईईजी हेडसेटद्वारे मेंदूतील अल्फा, बीटा, थीटा, डेल्टा बॅंड्सचं निरीक्षण करण्यात आलं. या अभ्यासात असं आढळून आलं की, चॅटजीपीटी वापरणाऱ्या गटाच्या मेंदूतील सृजनशीलता आणि स्मरणशक्तीशी संबंधित भागांमधील संपर्क सर्वांत कमी होता. याउलट, मेंदूनेच निबंध लिहिणाऱ्यांचा न्यूरल नेटवर्क सर्वात मजबूत होता. विशेष म्हणजे, चॅटजीपीटी वापरणाऱ्यांपैकी ८३ टक्के लोकांना त्यांनी लिहिलेल्या निबंधातील मजकूर आठवत नव्हता, तर केवळ मेंदू किंवा गुगल वापरणाऱ्यांमध्ये ही संख्या ११.१ टक्के होती. चॅटजीपीटी वापरकर्त्यांनी लेखन वेगानं पूर्ण केलं, पण त्यात सखोल विचार आणि मननाचा अभाव होता, असं ईईजीच्या निष्कर्षांवरून दिसून आलं. अभ्यासानुसार, एआयच्या अतिरेकी वापरामुळे मेंदूचा सक्रिय वापर कमी होतो आणि सृजनशीलतेवर परिणाम होतो. एआय साधनं, जसं की चॅटजीपीटी कार्यस्थळावर उत्पादकता लक्षणीयरित्या वाढवतात. एमआयटीच्या अभ्यासानुसार, चॅटजीपीटी वापरणाऱ्या व्यक्तींनी निबंध लेखनात कमी वेळात कार्य पूर्ण केलं. यामुळे विशेषतः त्या क्षेत्रांमध्ये फायदा होतो जिथे जलद माहिती प्रक्रिया आणि ड्राफ्ट तयार करणं आवश्यक आहे, जसे की पत्रकारिता, विपणन आणि ग्राहक सेवा, उदाहरणार्थ, एका पत्रकाराला एखाद्या विषयावर त्वरित माहिती हवी असल्यास, चॅटजीपीटी तात्काळ माहितीचा सारांश देऊ शकतो, त्यामुळे तासांचा वेळ वाचतो. एआय जटिल माहितीचं विश्लेषण करून ती साध्या भाषेत सादर करू शकते. उदाहरणार्थ, मोठ्या माहितीचं विश्लेषण करताना किंवा अहवाल तयार करताना, एआय साधनं मोठ्या प्रमाणात माहितीमधून महत्त्वाचे निष्कर्ष काढू शकतात. यामुळे कर्मचारी जास्तीत जास्त रचनात्मक आणि धोरणात्मक कार्यावर लक्ष केंद्रित करू शकतात.




आज विजयादशमी म्हणजेच दसरा. आज राज्यात खूप मेळावे होणार, नेते मार्गदर्शन करणार, कार्यकर्ते विचारांचे सोने लुटणार. दिवसभर महाराष्ट्रात मेळाव्यांचीच चर्चा सुरू राहील. मात्र, यंदा राज्यातील स्थिती खूप वेगळी आहे. अर्ध्या महाराष्ट्राला महापुराची झळ सोसावी लागली आहे. अतिवृष्टी आणि महापुरामुळे तब्बल ६० लाख हेक्टरवरील पिके उद्धवस्त झाली आहेत. शेतकर्‍यांच्या हाताशी काहीही उरले नाही. गावांना पुरांचा वेढा पडल्याने बहुतांश लोकांचे संसार पुरात वाहून गेले आहेत. अनेक लोकांकडे केवळ अंगावरील वस्त्र राहिले आहे. सर्वांच्या डोळ्यात अश्रू आहेत. त्यांच्या शेतीचा आणि अश्रूंचाही बांध फुटला आहे.

राज्यातील स्थिती भयंकर आणि चिंताजनक आहे. सरकार म्हणत आहे की, दिवाळीपूर्वी मदत मिळेल. अजून पंचनामे सुरू आहेत. अशी सर्व पार्श्वभूमी असताना मुंबई, पुण्यासह उर्वरित महाराष्ट्रात नवरात्र आणि दांडियाची धूम सुरू होती. अतिपावसाच्या पहिल्या चार दिवसांची तर कुणी दखलही घेतली नव्हती. वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांनी जोर लावल्यानंतर सरकारला जाग आली आणि त्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्री, पालकमंत्री एकदम शेतकर्‍यांच्या बांधावर धडकले. मात्र, आधी केलेल्या दुर्लक्षामुळे सरकार आणि महाराष्ट्रातील जनतेची असंवेदनशीलता दिसून येते. आपला पोशिंदा शेतकरी बरबाद झाला आहे, तो मदतीसाठी धाय मोकलून रडतोय, त्यांचे कुटुंब वारंवार सरकारकडे मदतीसाठी आवाहन करत आहे, अशावेळी मुंबई, पुण्यासह राज्यातील अनेक भागांत रात्री 12 वाजेपर्यंत गरब्यात लोक तालावर नाचत होते. महाराष्ट्रातील जनतेच्या असंवेदनशीलतेचा हा कळस म्हणावा लागेल. आता त्यात भर पडली आहे ती दसरा मेळाव्यांची.

दरवर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि शिवसेनेचा दसरा मेळावा होतो. महाराष्ट्रातील आजची स्थिती पाहता ठाकरेंच्या शिवसेनेने मेळावा रद्द करून तो खर्च शेतकर्‍यांच्या मदतीसाठी द्यावा, अशी सूचना भाजपच्या प्रवक्त्यांनी केली होती. माणुसकी म्हणून ही सूचना योग्य होती. मात्र, लोकासांगे ब्रह्मज्ञान स्वतः कोरडे पाषाण, अशीच ही सूचना होती. त्यांनी संघाच्या नागपूरमधील विजयादशमीच्या सोहळ्याबाबत का मौन राखले, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मेळाव्याबद्दल कुठलीही सूचना का केली नाही, भाजपच्या मंत्री असलेल्या पंकजा मुंडे यांच्या मेळाव्याबद्दल चकार शब्दही का काढला नाही? शिवाय मनोज जरांगे पाटीलदेखील मेळावा घेणार आहेत. असे असताना भाजप प्रवक्त्यांनी लंगडी बाजू मांडण्याचे प्रयोजन काय? ही एक प्रकारे पूरग्रस्त महाराष्ट्राशी केलेली प्रतारणाच म्हणावी लागेल. आता मुद्दा मेळाव्यांचा! तर महाराष्ट्रातील शेतकरी अश्रू ढाळत असताना राज्यात अनेक मेळावे दर्सयाच्या निमित्ताने होणार आहेत. संघाचा नागपुरात, दोन्ही शिवसेनांचा मुंबईत, पंकजा मुंडे आणि मनोज जरांगे पाटील यांचे बीड जिल्ह्यातील मेळावे लक्षात घेतले तर महाराष्ट्रावर जलसंकट ओढवले असताना खरंच एवढ्या मेळाव्यांची गरज आहे का, असा प्रश्न कुणालाही पडेल. खरंतर त्यांचे हे वार्षिक मेळावे आहेत आणि तो घ्यायचा की नाही हा निर्णय संबंधित पक्षांचा आहे. शिवाय तो पूरग्रस्त भागात घेतला जात नाही. त्यामुळे विरोध करण्याचे तसे कारण नाही. मात्र, त्यात भपकेपणा, इव्हेंटबाजी, दिखावूपणा टाळता आला तर खूप बरं होईल. कारण अर्धा महाराष्ट्र संकटात आहे.

### कृषी उत्पादने

येथील शेतकरी, सर्वसाधारण जनता मोठ्या संकटात आहे. त्यांना सावरायला बराच वेळ लागेल. शेतकर्‍यांचे पीक वाया गेले आहे. त्यांचा दसरा पुरात गेला आहे, दिवाळीही साजरी करता येणे शक्य नाही. अशावेळी त्यांना आनंद देता येत नसेल तर किमान त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार होऊ नये, अशी माफक अपेक्षा नेत्यांकडून करता येईल. प्रत्येकजण म्हणतो, शेतकर्‍यांच्या प्रश्नात राजकारण नको आणि प्रत्येकाचे पहिले पाऊल राजकीय असते, हे दुर्दैवी आहे. महाराष्ट्रात यापूर्वी दुष्काळ किंवा महापूर अशा घटना घडल्या की नुसत्या एका आवाहनानंतर गावागावातून मदत जमा होत असे, कलाकार त्यांच्याकडील निधी देत शिवाय रॅली काढून मदत गोळा करायचे. वेगवेगळ्या गावांमध्ये ही मदत पोहोचती केली जायची. तसे चित्र आता दिसत नाही. अभिनेते सोनू सूद यांचा अपवाद वगळता कुणी पुढे आल्याचे अजूनतरी दिसले नाही. उलट संपूर्ण मराठवाडा, सोलापूर, बुलढाणा, जळगाव, नाशिक आदी जिल्ह्यांमध्ये महापूर असताना मुंबईसह मोठ्या शहरांमधील लोक गरब्यामध्ये मश्गुल झाले होते. यात अनेक राजकीय नेत्यांचाही समावेश आहे. मराठवाड्याला महापुराचा वेढा असताना अंबादास दानवे, ओमराजे निंबाळकर अशा निवडक नेत्यांचा अपवाद वगळता सरकारनेही दखल घेतली नव्हती. त्यानंतर राजकीय मदतीचा ओघ सुरू झाला खरा मात्र, मदत करताना उपकाराचीच भावना जास्त दिसत होती. महाराष्ट्रातील माणुसकी इतकी रसातळाला गेली आहे का? एके काळी कुठल्याही राज्याला आपत्तीची झळ बसली की महाराष्ट्रातून पहिली मदत जात होती. धान्य, आर्थिक आणि वैद्यकीय मदत पोहोचती केली जात असे. मात्र, महाराष्ट्र अडचणीत असताना कुठल्याही राज्याने अजूनतरी मदतीचा हात दिलेला नाही. एवढी असंवेदनशीलता यापूर्वी महाराष्ट्राने कधी अनुभवली नाही. कुणालाही संकटग्रस्त शेतकरी, गरीब जनतेच्या मदतीला धावावे, असे वाटले नाही. हे संवेदनशीलता मेल्याचे लक्षण आहे.

# यंदा दिवाळीला विजेची करा बचत
## सोलार लाईटने सजवा घर






घरोघरी दिवाळीची तयारी सुरू झाली आहे. त्यातच तुम्ही पण जर दिवाळी डेकोरेशनचा विचार करत असाल तर सामान्य लाइटिंग ऐवजी यंदा तुम्ही तुमचे घर सोलार लाईटने सजवू शकता. आजकाल आपण बाहेर अनेक ठिकाणी सोलार लाईटचा वापर होत असल्याचे पाहतो. मग हे सोलार लाईट तुम्ही बाहेरच्या वापरापुरते मर्यादित न ठेवता घरीही आणू शकता. विशेष म्हणजे सूर्यप्रकाशाने चार्ज होणारे हे लाईट्स असल्याने तुमची विजेचीही बचत होते. तसेच हे दिवे पर्यावरणपूरक, आकर्षक आणि स्टायलिश असतात ज्यामुळे घराला अनोखा आणि रॉयल लूक मिळतो. चला तर मग दिवाळीच्या सजावटीसाठी काही सोलार लाईटचे प्रकार समजून घेऊ...

- **सोलार स्ट्रिंग लाइट्स :** सोलार स्ट्रिंग लाइट्स वापरून तुम्ही तुमची बाल्कनी सजवू शकता. हे दिवे बाल्कनीच्या रेलिंग किंवा छतावर लटकवा. दिवसा सूर्यप्रकाशाने हे दिवे चार्ज होतात आणि रात्री चमकतात.

- **सोलार स्टेक लाइट्स :** सोलार स्टेक लाइट्स रात्रीच्या वेळी आकर्षक दिसतात. यामध्ये फुल, फुलपाखरूचा आकार किंवा ड्रॉप डिझाईन चांगला पर्याय ठरते.

- **सोलार जार लाइट्स :** सोलार जार लाइट्स केवळ बाहेरच नव्हे तर घरातही वापरले जाऊ शकतात. दिवसा खिडकीजवळ हे दिवे ठेवल्यास चार्ज होतात आणि नंतर बुकशेल्फ, कॉफी टेबल किंवा रात्री घराच्या एखाद्या कोपऱ्यात ठेऊ शकता. यामुळे तुमच्या रूमला मॉडर्न लूक मिळेल.

- **रंग बदलणारे सोलार लाईट्स :** दिवाळीच्या काळात सजावटीचे सोलार लाईट्स विविध रंगांमध्ये उपलब्ध असतात. रंग बदलणारे सोलार लाईट्स किंवा कंदील चांगला पर्याय ठरतात. तसेच सूर्यप्रकाशाने हे चार्ज होत असल्याने तुम्हाला इलेक्ट्रिकल सॉकेटची गरज भासत नाही. त्यामुळे तुम्ही हवे त्या जागेवर हे लाईट लावू शकता. मात्र शक्यतो ज्या ठिकाणी सूर्यप्रकाश असेल त्या ठिकाणी हे दिवे लावावे.

# चिकट भिंती, दारं, खिडक्यांवरील धूळ झटक्यात होईल साफ



आता नवरात्र उत्सव संपला आहे. त्यामुळे घरोघरी दिवाळीची जय्यत तयारी सुरू झाली आहे. आता दिवाळी म्हंटले की सर्वात आधी असते ती घरची साफसफाई. यंदा मात्र दिवाळीची साफसफाई करताना तुम्हाला काही टिप्सची मदत होईल. जर तुमच्या दार आणि खिडक्यांच्या ग्रीलवर जाळं, धूळ साचली असेल तसेच स्वयंपाकघरातील भिंती चिकट झालेल्या असतील तर पटकन या सोप्या टिप्स वापरून तुम्ही ते स्वच्छ करू शकता.

**दारं, खिडक्या साफ करण्यासाठी टिप्स**

दार आणि खिडक्यांचे ग्रील साफ करण्यासाठी सर्वात आधी झाडूने वरची धूळ काढून घ्या.

यानंतर १ बादली कोमट पाणी घेऊन त्यात डिशवॉशिंग लिक्विड, व्हिनेगर, टाका. यानंतर या पाण्याने खिडक्या, दार आणि ग्रील पुसून घ्या. पुन्हा शेवटी कोरड्या कापडाने सर्व स्वच्छ करून घ्या. यामुळे धूळ आणि चिकटपणा नाहीसा होईल.

**भिंती, टाईल्स अशा करा स्वच्छ**

स्वयंपाकघरातील भिंती, टाईल्स अनेकदा चिकट झालेल्या असतात. नुसते पुसल्याने हा चिकटपणा जात नाही. अशा वेळी काही घरगुती साहित्य वापरून तुम्ही झटकन ते स्वच्छ करू शकता.

यासाठी बेकिंग सोडा, व्हिनेगर, लिंबाचा रस आणि थोडे पाणी हे सर्व काही मिक्स करा. हे पाणी एखाद्या स्प्रे बॉटलमध्ये काढून घ्या. हे पाणी भिंत, टाईल्सवर स्प्रे करून ५ ते १० मिनिटे तसेच राहूद्या. नंतर स्वच्छ पुसून घ्या. यासाठी तुम्ही जुना टूथब्रश किंवा स्क्रबर देखील वापरू शकता.

या काही सोप्या टिप्स आहेत ज्यामुळे साफसफाई करताना तुम्हाला मदत होईल. यासाठी कोणतीही महागडी उत्पादने वापरण्याची गरज नाही. तुम्ही अगदी कमी आणि घरच्या घरी उपलब्ध असणाऱ्या साहित्यात घरची स्वच्छता करू शकता.

# यंदा साजरी करा इको फ्रेंडली दिवाळी, वापरा या ट्रिक्स





नुकताच नवरात्र, दसरा सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आता १८ ऑक्टोंबरपासून दिवाळी सुरु होणार आहे. दिवाळी उत्साहाचा, रोषणाईचा सण असतो. रंगीबेरंगी रांगोळ्या, दिव्यांनी या दिवसात वातावरण न्हाहून निघते, फटाके वाजवले जातात. पण, फटाके आरोग्यासाठी हानिकारक असतात. फटाक्यांमुळे प्रदुषण होते. तसेच घर सजावटीसाठी विविध वस्तूंचा वापर करण्यात येतो, ज्यात सर्रासपणे प्लास्टिकचा वापर केलेला असतो. अशा परिस्थितीत पर्यावरणाचे नुकसान फार मोठ्या प्रमाणावर होते. यासाठी तुम्ही इको-फ्रेंडली दिवाळी साजरी करणे आवश्यक असते. आज आपण जाणून घेऊयात अशा ट्रिक्स ज्याद्वारे दिवाळीही साजरी होईल आणि पर्यावरणाचे नुकसान होणार नाही.

- **घराची सजावट :** दिवाळी जवळ आली की, बाजारात विविध वस्तू येतात. ज्यातील अध्यार्हून अधिक वस्तू या प्लास्टिकच्या असतात. ज्यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचते. त्यामुळे तुम्ही इको- फ्रेंडली दिवाळी साजरी करण्यासाठी डिझायनर कपडे, फुले, झाडांची पाने यांचा वापर करता येईल.

- **मातीचे दिवे :** हल्ली बाजारात प्लास्टिक आणि इतर मटेरियलचे दिवे मिळतात. पण, यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचते. त्यामुळे तुम्ही मातीचे दिवे लावायला हवेत. विविध आकाराचे आणि डिझाइनचे दिवे खरेदी करता येतील.

- **फटाके टाळा :** दिवसेंदिवस वाढत जाणारे प्रदुषण पाहता फटाके वाजविणे टाळा. याची सुरुवात तुम्ही यावषीर्पासून करू शकता.

- **फुलांची रांगोळी :** यंदा हानिकारक केमिकल्सचा वापर करून तयार झालेले रंग टाळून फुलांची रांगोळी काढू शकता. यासाठी गुलाब, झेंडू आदी फुलांचा वापर करता येईल.

- **गिफ्ट्स ऑप्शन्स :** दिवाळीत नातेवाईकांना, मित्र मैत्रिणींना विविध गिफ्ट दिले जातात. हे गिफ्ट पॅक करण्यासाठी विविध प्रकारचे पॅकिंग बॅग्स किंवा बॉक्स वापरले जातात. अशा वेळी प्लास्टिकचा वापर सर्रासरणे केला जातो. त्यामुळे तुम्ही गिफ्टिंगसाठी कपड्यांच्या बॅग्ज वापरायला हव्यात.

# प्रत्येक मुलीच्या वॉडरोबमध्ये असायला हवेत हे कपडे



मुलींना फॅशनबाबतीत कायम अव्वल राहायचे असते, त्यामुळे मुली विविध प्रकारचे आउटफिट खरेदी करण्यावर भर देतात. पण, तरीही अनेक मुलींना दररोज एकच प्रश्न पडतो की, आज काय घालू? तुम्हालाही असा प्रश्न पडत असेल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. वॉडरोबमध्ये ढिगभर कपडे असतात पण, त्यातील अध्यार्हून अधिक हे एकाच रंगाचे, एकाच पॅटर्नचे असतात. त्यामुळे आपल्याकडे कपडेच नाहीत असे वाटते. अशा परिस्थितीत तुम्ही स्मार्ट युक्त्या वापरायला हव्यात. आज आपण अशा कपड्यांचे पॅटर्न पाहूयात जे प्रत्येक मुलीच्या वॉडरोबमध्ये असायला हव्यात.

**टिप्स :**

- हल्ली बऱ्याच मुली वेस्टर्न ड्रेस घालण्यास पसंती दर्शवतात. तुम्हाला जास्त मॉडर्न वेस्टर्न कपडे घालायचे नसतील तर तुम्ही लॉंग ड्रेसवर बेल्ट वापरू शकता. बाजारात विविध पद्धतीचे स्टायलिश बेल्ट मिळतात.
- डेनिम जीन्स एव्हरग्रीन आहे. विशेष करून जर तुमच्याकडे निळ्या जीन्स आणि काळ्या जीन्सची जोडी असेल तर तुमच्या जवळजवळ सर्व फॅशन समस्या सुटतील.
- स्ट्रेट फिट कुर्ती तुमच्याकडे असावली हवी. साध्या पारंपरिक लूकसाठी हा उत्तम पर्याय आहे.
- मॅक्सी ड्रेस वॉर्डरोबमध्ये असायला हवा. तुम्हाला कॅज्युअल आणि सेमी-फॉर्मल प्रसंगी मॅक्सी ड्रेस घातला येईल.
- टी-शर्ट, प्लेन टॉप, मॅक्सी ड्रेस, शॉर्ट ड्रेस आणि स्पेगेटी ड्रेसवर डेनिम जॅकेट घालता येते. त्यामुळे डेनिम जॅकेट खरेदी करा.
- बाजारात जॅकेट स्टाइलपासून ते केप स्टाइलपर्यंत विविध प्रकारचे श्रग मिळतात. जे तुम्ही जीन्सपासून ते अगदी साडीवर घालू शकता.
- ऑफिससाठी परफेक्ट लूक हवा असेल तर कलरफूल ट्राउझर्स तुमच्याकडे असायला हव्यात. या ट्राउझर्ससोबत तुम्ही शर्ट, टॉप, कुर्ती घालू शकता.

# आई-वडीलांनी मुलींना सांगायलाच हव्यात या गोष्टी



आई-वडिलांच्या काळजाचा तुकडा म्हटले की, प्रत्येक घरातील मुली डोळ्यांसमोर उभे राहतात. घरातील मुली हसत खेळत असतील तर घरही हसत खेळत राहते. प्रत्येक आईवडिलांनाही हेच हवे असते. पण, हळूहळू मुली मोठ्या होतात आणि आयुष्यातील विविध आव्हानांना, संकटांना सामोरे जावे लागते. अशा स्थितीत पालकांनी लहान वयातच मुलींना काही गोष्टी शिकवल्या तर मुलींमध्ये आत्मविश्वास वाढू शकतो. आज आपण अशा गोष्टी जाणून घेऊयात, ज्या प्रत्येक आईवडिलांनी आपल्या लेकीला अवश्य सांगायला हव्यात. ज्या गोष्टी शिकून त्या समजात निडरपणे वावरू शकतील. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत या गोष्टी,

- **तुझ्या मताला महत्त्व आहे –** मुलींना हे शिकवा की, तिचं मतही महत्त्वाचे आहे. तिला सांगा की तिने तिचे मत ठामपणे मांडायला हवे. तिचे महत्त्व आजूबाजूच्या लोकांना पटवून द्यायला हवे.
- **नाही म्हणणे –** मुलींना गरज लागेल तिथे नाही म्हणण्यास शिकवा. जर एखादी गोष्ट तिला आवडत नसेल तर तिच्या आनंदासाठी योग्य नसेल तर त्या गोष्टीला नाही म्हणायला शिकावे. कायम दुसझ्यासाठी हो म्हणण्याची गरज नाही.
- **तु जशी आहेस तशी परफेक्ट आहेस –** प्रत्येक आई-वडिलांनी मुलींना 'तु जशी आहेस तशी परफेक्ट आहेस' हे अवश्य सांगावे. तिचे दिसणे, तिला मिळालेले मार्क किंवा तिने मिळवलेली यामुळे यश यामुळे ती पूर्ण होत नाही, हे अवश्य सांगावे.
- **चुकांमुळे ओळख ठरत नाही –** तुमच्या मुलीला हे शिकवा की, तिच्या चुकांमुळे तिची ओळख ठरत आहे. चुका या सर्वांकडून होतात. पण, त्याबद्दल सतत पश्चाताप करत बसू नये.

# ब्लड टेस्ट करायला जाताय? मग या गोष्टी माहित असणे गरजेचे



अनेकदा आपण डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ब्लड टेस्ट करतो. या रक्ताच्या चाचणीमुळे आजार किंवा संसगार्चे निदान होते. ज्यामुळे योग्य उपचार घेण्यास मदत होते. रक्त तपासणीमुळे रक्त संक्रमण, रक्तातील ग्लुकोजची पातळी, लाल आणि पांढऱ्या रक्त पेशींची संख्या, प्लेटलेट संख्या आणि प्लाज्मा पातळीची अचूक माहिती मिळते. रक्त तपासणी करण्यापूर्वी तुम्हाला काही गोष्टी माहित असणे गरजेचे आहे. कारण बहुतेकदा रक्त तपासणी करताना आपण या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो.

**रिकाम्या पोटीच ब्लड टेस्ट करावी का?**

अनेकदा असे म्हंटले जाते की रिकाम्या पोटीच ब्लड टेस्ट करावी मात्र यामध्ये कितपत तथ्य आहे हे जाणून घेऊयाङ्क तर तज्ञांच्या मते, रक्त चाचण्या, जसे की शुगर, लिपिड प्रोफाइल किंवा थायरॉईड या रिकाम्या पोटीच करणे बंधनकारक असते. या ब्लड टेस्ट करण्यापूर्वी ८ ते १२ तास काहीही खाऊ नये. या काळात पाणी पिल्यास हरकत नाही. मात्र चहा, कॉफी, ज्यूस घेतल्यास देखील योग्य निदान होत नाही.


**औषध :** रक्त तपासणी करण्यापूर्वी, कोणतीही औषधे घेत असाल तर डॉक्टरांना कळवणे गरजेचे आहे. जसे की, तुम्ही जर रक्तदाब, मधुमेह किंवा हृदयरोगाची नियमित औषधे घेऊन ब्लड टेस्ट करणार असाल तर आधी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**व्यायाम टाळा :** जर तुमच्या रक्तातील साखर किंवा कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जास्त असेल, तर रक्त तपासणीपूर्वी जास्त व्यायाम करणे किंवा चालणे टाळा. यामुळे रक्तातील साखर किंवा कोलेस्ट्रॉलची पातळी कमी जास्त होऊ शकते. त्यामुळे रक्त चाचणीपूर्वी किमान २४ तास व्यायाम करू नये.

**पुरेशी झोप :** रक्त तपासणीपूर्वी पुरेशी झोप घेणे देखील महत्त्वाचे आहे. झोपेच्या अभावामुळे हार्मोन्स आणि साखरेच्या पातळीवर परिणाम होतो, ज्यामुळे चुकीचे निदान होऊ शकते.

**मद्यपान आणि धूम्रपान :** रक्त तपासणी करण्यापूर्वी किमान २४ तास आधी मद्यपान किंवा धूम्रपान टाळावे. यामुळे लिपिड प्रोफाइल आणि रक्तातील साखरेच्या पातळीवर परिणाम होतो.

# पुरूषहो, तुम्हाला १६ वर्षांची मुलगी आहे?
## तिला न चुकता सांगा या ६ गोष्टी, आयुष्यात कधीच कोण घेणार नाही गैरफायदा



लहान मुलगी जसजशी मोठी होत जाते, तसतसं तिचं आयुष्य अनेक नव्या वळणांमधून जातं. विशेषतः १५ ते १८ वयाच्या टप्प्यात ती किशोरवयीन अवस्थेतून प्रौढतेकडे वाटचाल करत असते. या काळात तिच्या मनात प्रश्नांची गर्दी होते, समाजाशी जुळवून घ्यावं लागतं आणि स्वतःला ओळखण्याची सुरुवात होते. म्हणूनच या वयात मिळालेली शिकवण तिच्या आयुष्याचा पाया ठरते. आई-वडिलांची भूमिका इथे फार महत्त्वाची आहे. मुलगी जरी आईशी जास्त बोलत असली, तरी वडिलांचा आधार तिच्यासाठी वेगळाच असतो. तिच्या आत्मविश्वासात, विचारसरणीत आणि निर्णयक्षमतेत वडिलांचे शब्द अमूल्य ठरतात. या वयात दिलेली शिकवण तिच्या संपूर्ण आयुष्याला दिशा देऊ शकते. म्हणूनच वडिलांनी काही गोष्टी मुलीला स्पष्टपणे सांगणे गरजेचे आहे, ज्या तिला आयुष्यभर धीर, ताकद आणि आत्मनिर्भरता देतील.

**स्वत:ची किंमत स्वत: ठरवा**

वडिलांनी मुलीला नेहमी समजावलं पाहिजे की तिची किंमत दुसऱ्यांच्या मतावर अवलंबून नाही. समाज काय म्हणतो, लोक काय विचार करतात हे गौण आहे. खरी ओळख ती स्वतः ठरवते. जर एखाद्याने तुज्या कामाचं कौतुक केलं नाही, तरी त्याने तुझी किंमत कमी होत नाही. उलट तुज्या मेहनतीचं आणि गुणांचं मूल्य तुलाच जाणून घ्यावं लागतं. असं शिकवलं तर ती बाहेरच्या न्यायनिवाड्यांवर अवलंबून न राहता आत्मविश्वासाने उभी राहू शकते.

**नकार देणं म्हणजेच धैर्य**

अनेकदा मुलींना ''नाही'' म्हणणं अवघड जातं. त्यांना वाटतं की समोरच्याला दुखावू नये. पण वडिलांनी तिला समजावलं पाहिजे की ''नाही'' म्हणणं हे देखील एक धैर्य आहे. यासाठी वेगळ्या स्पष्टीकरणाची गरज नाही. कुठल्याही नात्यात सीमा आखणं महत्त्वाचं असतं. जो साथीदार किंवा मित्र खरंच तुझा आहे, तो तुज्या मयार्दांचा सन्मान करेल. नकार देण्याची कला शिकली की ती आयुष्याच्या अनेक प्रसंगांत मजबूत राहू शकते.

**चुकीचं वाटलं तर आवाज उठवा**

लोक म्हणतात की शांत राहणं हे मोठेपणाचं लक्षण आहे, पण प्रत्येकवेळी तसं नसतं. जर काही अन्यायकारक वाटलं, किंवा चुकीचा अनुभव आला, तर शांत बसू नये. मुलीला हे शिकवलं पाहिजे की दयाळूपणा तिची ताकद आहे, पण तो कमकुवतपणा ठरता कामा नये. चुकीचं दिसलं की त्याविरोधात आवाज उठवणं हाच खरी ताकदीचा वापर आहे. यामुळे तिच्यात आत्मसन्मान वाढतो आणि ती स्वतःसाठी उभी राहायला शिकते.

**शिक्षण हीच खरी शक्ती**

वडिलांनी मुलीला नेहमी आठवण करून द्यावी की तिचं खरं सामर्थ्य तिच्या शिक्षणात आहे. ही अशी ताकद आहे जी कोणी हिरावून घेऊ शकत नाही. जेव्हा ज्ञान आणि कौशल्य हाताशी असतं, तेव्हा ती कोणत्याही संकटातून मार्ग काढू शकते. शिवाय, दिलेलं वचन पूर्ण करणं आणि विश्वास पाळणं हीसुद्धा वडिलांची जबाबदारी आहे. कारण विश्वास हा मुलीसाठी सर्वात मौल्यवान ठेवा ठरतो, जो तिच्या आयुष्याला मजबूत बनवतो.

**प्रत्येकाला खुश करत बसण्याची गरज नाही**

अभ्यासक म्हणतात की वडिलांनी त्यांच्या मुलींना समजावून सांगितले पाहिजे की त्यांनी दिसेल त्या प्रत्येकाला खुश करण्याचा प्रयत्न करू नये कारण परिपूर्ण लोकांमध्येही टीकाकार असतात. तसेच, कमीत कमी पाच पौष्टिक जेवण बनवायला शिक, कारण तुमचे आरोग्य त्यावर अवलंबून असेल.

**योग्य मित्र निवडा आणि वेळेचं महत्त्व जाणून घ्या**

मित्रमंडळी आयुष्यात मोठं स्थान घेतात. म्हणून मुलीला हे शिकवावं की तिने असेच मित्र निवडावेत, जे तिच्या यशावर मनापासून खुश होतील आणि गरजेच्या वेळी आधार देतील. त्याचबरोबर, वेळ ही एक संपत्ती आहे. पैसे जपून वापरतो तसा वेळही विचारपूर्वक वापरला पाहिजे. योग्य ठिकाणी, योग्य लोकांसोबत तो खर्च केला तर आयुष्य आनंदी आणि समृद्ध होतं.

# विकास प्रकल्प वेळेत पूर्ण करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे संबंधित विभागाला आदेश



**पेट्रोल पंप, फूड मॉल समृद्धी महामार्गावर सोयीसुविधा!**

समृद्धी महामार्गावर १६ ठिकाणी स्वच्छतागृहांची व्यवस्था उभारण्यात येत आहे. तसेच पेट्रोल पंप, फूड मॉलची सुविधा असावी. स्वच्छतागृहांच्या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यात यावा. यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सल्लागार नियुक्त करावा. महामार्गावर १६ पैकी किमान चार ठिकाणी तरी एमएसआरडीसीने पर्यटनाच्या दृष्टीने केंद्र निर्माण करावीत. राज्यात पायाभूत सोयी सुविधांच्या प्रकल्पांकरिता निधी उभारण्यासाठी इच्छुक असलेल्या गुंतवणूकदारांच्या निधीतून भूसंपादनासह विकास प्रक्रिया राबवावी. पुढील विकासात त्यांचा सहभाग घेऊन निश्चित मोबदला त्यांना मिळण्याची व्यवस्था करावी. निधी उभारणीचे नवीन मॉडेल विकसित करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**■बातमी/लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्र राज्याचा विकास झपाट्याने होत असून सद्यस्थितीत तब्बल १० लाख कोटींची विकास कामे सुरू आहेत. मात्र विकास कामे करताना राज्याला आर्थिक भुर्दंड पडू नये यासाठी प्रकल्प वेळेत पूर्ण करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला दिले आहेत. दरम्यान, नागपूर-चंद्रपूर २०४ किलोमीटर लांब चार पदरी सिमेंट काँक्रीट महामागार्ला मंजुरी मिळाली आहे. चंद्रपूर ते मूल दरम्यान महामार्ग निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्गात भूसंपादनासह एकूण २,३५३.३९ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भविष्यामध्ये कुठलाही रस्ता बांधताना रस्त्याच्या परिसरात विकासाची 'इकोसिस्टीम' निर्माण करण्यात यावी. त्यासाठी आधीपासूनच भूसंपादन करून नियोजन करण्याचे निर्देशही दिले. नागपूर ते चंद्रपूर महामार्ग नवेगाव मोरेपर्यंत करण्यात येत असल्याने पुढे सुरजागड लोह प्रकल्पापर्यंत या महामागार्ची लांबी वाढवण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय, प्रधान सचिव (विधी व न्याय) सुवर्णा केवले, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.

राज्यामध्ये यापुढे पायाभूत सुविधांची कामे घेताना ती आधी गतिशक्ती पोर्टलवर आणावी. गतिशक्ती पोर्टलवर घेतल्याशिवाय प्रकल्पाचे काम सुरू करू नये. यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सिंचन प्रकल्पांची कामे घेतानाही भविष्यात येणाऱ्या अडचणी बघून सुरुवातीपासूनच नियोजन करावे. या प्रकल्पांचे भूसंपादन आधीच करून नंतर कामाला सुरुवात करावी.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रकल्पांच्या सहज क्रियान्वयनाकरिता विस्तार करीत वेगवेगळे विभाग निर्माण करावे. पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती मिळण्यासाठी बाह्य स्त्रोतांद्वारे संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ मनुष्यबळ घ्यावे. पायाभूत सोयी सुविधा प्रकल्पांना दिलेल्या आयडीमुळे देयकातील अनियमिततेवर निर्बंध येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम आणि पाणीपुरवठा विभागाने जुनी देयके अदा करण्यासाठी दायित्वानुसार कालबद्ध कार्यक्रम राबवावा. विभागांनी झालेल्या कामांचीच देयके अदा होतील, यासाठी आणि देयकांच्या तपासणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने यंत्रणा विकसित करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

# २५ लाखांची लाच घेताना रंगेहाथ अटक, २ दिवसांची एसीबी कोठडी

**■ठाणे। प्रतिनिधी:**

ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे उपायुक्त शंकर पाटोळे यांना २५ लाख रुपयांची लाच घेताना मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले आहे. खासगी जागेवरील अतिक्रमण (तीन गाळे) काढण्यासाठी ही लाच मागितली गेली होती. या कारवाईमुळे ठाण्यातील बांधकामांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. ठाणे न्यायालयाने गुरुवारी पाटोळे यांना दोन दिवसांची एसीबी कोठडी सुनावली आहे.



पाटोळे आणि त्यांचे सहकारी संतोष तोडकर यांच्या सांगण्यावरून व्यावसायिकाने १० लाख रुपये सुशांत सुर्वे यांच्या बँक खात्यात जमा केले. १० लाख मिळाल्यावर पाटोळे यांनी ३१ जुलै आणि १९ ऑगस्ट २०२५ रोजी संबंधित बांधकामांना दोन नोटीस बजावल्या; मात्र प्रत्यक्षात गाळे हटवण्याची कोणतीच कारवाई झाली नाही. १० लाख देऊनही कारवाई न झाल्याने विकासक हैराण झाला होता. पालिकेतील सूत्रांनुसार, एका प्रभावशाली नेत्याच्या जवळ असलेल्या याच विकासकाला पाटोळे यांनी आपल्या केबिनबाहेर पाच तासांहून अधिक वेळ ताटकळत ठेवले होते.

पुढील भेटीत पाटोळे यांनी पुन्हा ५० लाखांचा आकडा कागदावर लिहून देत आणखी पैशांची मागणी केली. मात्र अखेर व्यावसायिकाने एसीबीकडे तक्रार केली. या प्रकरणी एसीबीने सापळा रचला. ठाणे महापालिकेचा वर्धापनदिन असल्याने मुख्यालयातील कर्मचारी व अधिकारी एका कार्यक्रमात व्यस्त असताना पाटोळे यांनी विकासकाला पैसे घेऊन येण्यास सांगितले. सायंकाळी ५.३० च्या सुमारास विकासक २५ लाखांचा पहिला हप्ता घेऊन आला. पाटोळे यांनी रक्कम थेट आपल्या गाडीत ठेवण्यास सांगितले.

पाटोळे यांच्या व्यक्तीने गाडीत जाऊन रक्कम घेतली आणि पाटोळे यांनी 'ओके-डन' म्हणताच एसीबीच्या पथकाने त्यांना महापालिका मुख्यालयातील त्यांच्याच केबिनमध्ये रंगेहाथ पकडले. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईतील एका बांधकाम व्यावसायिकाने ठाण्यातील विष्णुनगर (घंटाळी) परिसरातील जागा विकसित करण्यासाठी घेतली होती. या जागेत तीन अनधिकृत दुकाने (गाळे) उभारलेली होती. जागा मालकाने वारंवार तक्रार करूनही कारवाई झाली नाही. अखेर ८७ वर्षीय जागा मालकाने सर्व अधिकारपत्र व्यावसायिकाला दिले. या अनधिकृत गाळ्यांवर कारवाईसाठी व्यावसायिकाने पाटोळे यांची भेट घेतली. पाटोळे यांनी कारवाईसाठी सुरुवातीला २० लाखांची मागणी केली होती, जी नंतर वाढून ५० लाख झाली.

# गुन्हेगारीमुक्तीसाठी ८ दिवसांत ठोस कारवाई

## पोलीस आयुक्त संदीप कर्णिकांचे भाजप आमदारांना आश्वासन

**■नाशिक। प्रतिनिधी:**

नाशिक शहरातील वाढलेली गुन्हेगारी व व्यसनांवर आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजप नाशिक महानगरतर्फे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना निवेदनाव्दारे करण्यात आली. शहरात ८ ते १० दिवसांत सकारात्मक बदल दिसेल, असे आश्वासन पोलीस आयुक्त कर्णिक यांनी दिल्याचे आ. प्रा. देवयानी फरांदे यांनी सांगितले. यावेळी आमदार प्रा. देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे व आमदार राहुल ढिकले, शहर अध्यक्ष सुनील केदार यांनी नाशिक शहरातील गुन्हेगारीचा आढावा घेतला.

नाशिक शहर हे सांस्कृतिक, औद्योगिक व शैक्षणिक केंद्र असून, येथील शांततेची परंपरा कायम ठेवणे ही काळाची गरज आहे. नाशिक शहरात चोरी, दरोडे, लूटमार, सोनसाखळी ओढणे, एमडी ड्रग्ज, अवैध धंदे, टोळीयुद्ध यामध्ये वाढ झाली आहे. तरुणाईमध्ये व्यसनाधीनतेचे वेगाने वाढत आहे. मादक पदार्थांचे सेवन व विक्री यामुळे तरुण पिढी गुन्हेगारीकडे ओढली जात आहे. ही परिस्थिती नाशिकच्या भविष्यासाठी चिंताजनक व धोकादायक आहे.

**अशा आहेत मागण्या**

- शहरातील संवेदनशील भागात गस्त वाढवावी. २४ तास गस्ती पथकांची नेमणूक करावी. सी.सी.टीव्ही



कॅमेरे बसवून २४ तास कार्यरत ठेवून नियमित देखभाल करावी.
- अंमली पदार्थांचे सेवन, विक्री व त्यामागील रॅकेट्सवर कठोर कारवाई करावी. व्यसनांना आळा घालण्यासाठी विशेष मोहिमा व जनजागृती उपक्रम राबवावव्यात. गुन्हेगारी टोळ्यांची भांडणे व गटबाजीवर नियंत्रणासाठी विशेष कार्यबल स्थापन करावे.
- नागरिकांच्या सुरक्षेसाठी मोहल्ला सुरक्षा समित्या सक्रिय कराव्यात. नागरिकांनी दिलेल्या तक्रारींवर कारवाई करावी.

**काय म्हणाल्या आ. प्रा. देवयानी फरांदे**

- नाशिक शहर सुरक्षित राहण्यासाठी कर्तव्य म्हणून पोलीस आयुक्तांची भेट घेतली. पोलीस आयुक्तांशी नाशिक शहरातील वाढलेली गुन्हेगारी व वाहतूक समस्या सोडवण्याबाबत चर्चा झाली. नाशिक जुनी ओळख पुसली जावू नये. कायदा हातात घेणा□यांवर पोलीस कारवाई करताना दिसून येतील.
- गुन्हेगाराला कोणताही पक्ष नसतो. जे चुकतील त्यांच्यावर भाजपकडून योग्य वेळी उपचार आणि ऑपरेशन केले जाते. भाजपकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकप्रतिनिधींची तपासली जात आहे. कोणत्याही गुन्हेगाराला पाठीशी घातले जाणार नाही. सरकार भाजपचे असले तरी भाजपच्या दोन माजी नगरसेवकांना मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने झाली असून कोणालाही पाठीशी घातले जात नाही. त्यामागे राजकारण करणाऱ्यांची भाजपकडून दखल घेतली जाईल.
- मित्र पक्षाचे मंत्री दादा भुसे यांच्यासह मंत्री गिरीश महाजन यांनीही पोलीस आयुक्तांशी चर्चा केली आहे.
- एमडी प्रकरणातील ललित पाटील कोणत्या पक्षातील आहे. भाजप सत्तेमध्ये असून, पोलिसांवर दबाव टाकला जात नाही. त्यामुळे भाजपच्या दोन माजी नगरसेवकांवर कारवाई झाली. आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विरोधकांकडून भाजप पोलिसांवर दबाव टाकत असल्याचा आरोप केला जात आहे.

# खेळता खेळता चुकून लिफ्टमध्ये गेला अन् अडकला... ११ वर्षाच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू

**■पिंपरी। प्रतिनिधी:**

पिंपरी-चिंचवडमध्ये दसऱ्याच्या शुभ दिनी धक्कादायक घटना घडली. चौवीसवाडी येथे गुरुवारी (दि. २) संध्याकाळी एका ११ वर्षाच्या मुलाचा लिफ्टमध्ये अडकून दुर्दैवी मृत्यू झाला. राम स्मृती गृहनिर्माण सोसायटीतील लिफ्टमध्ये ही घटना घडली. खेळता खेळता हा मुलगा लिफ्टमध्ये गेला आणि अचानक लिफ्ट बंद पडली. तीन तासाहून अधिक वेळ तो लिफ्टमध्ये अडकला होता. मदत उशिरा मिळाल्याने अखेर त्याचा मृत्यू झाला.

**तिसऱ्या-चौथ्या मजल्याच्या मध्येच अडकले पाय**

मिळालेल्या माहितीनुसार, मृत्यू झालेल्या मुलाचे नाव अमेय साहेबराव फडतरे आहे. अमेय दुपारी साधारणपणे ३ च्या सुमारास खेळत असताना इमारतीतील लिफ्टमध्ये गेला. मात्र, लिफ्ट अचानक तिसऱ्या आणि चौथ्या मजल्याच्या दरम्यान अडकली. यामध्ये तो आतमध्येच फसला. सुरुवातीला कोणालाही ही घटना लक्षात आली नाही. तीन तासांहून अधिक काळ तो मदतीसाठी ओरडत होता. त्याचे पाय तिसऱ्या आणि चौथ्या मजल्याच्या



मध्येच अडकले होते. काही वेळाने रहिवाशांना आवाज ऐकू आला, त्यानंतर त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला कळवले.

सूचना मिळाल्यानंतर अग्निशमन दल आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. लिफ्ट खाली आणून मुलाला बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्याला लगेचच जवळच्या केके रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर अमेयला मृत घोषित केले.

**३ वाजता अडकला पण...**

अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना संध्याकाळी ५.०५ वाजता घटनेची माहिती देण्यात आली. परंतु, सोसायटीतील रहिवाशांच्या मते, मुलगा दुपारी ३ वाजल्यापासून लिफ्टमध्ये अडकला होता, परंतु कोणालाही त्याचा पत्ता लागला नाही. प्राथमिक तपासानुसार त्याचा गुदमरून मृत्यू झाला. रहिवाशांनी लिफ्टच्या नियमित देखभालीतील निष्काळजीपणावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणी दिघी पोलिस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू असल्याचे ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी सांगितले. पोलिस तसेच संबंधित विभागांकडून लिफ्ट देखभालीबाबत चौकशी होण्याची शक्यता आहे. दसऱ्यासारख्या शुभ दिवशी घडलेल्या या घटनेमुळे चौवीसवाडी परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेनंतर लिफ्ट सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, संबंधित यंत्रणांनी तातडीने कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# यू ट्यूबवर व्हिडीओ पाहून चोरी

## बनावट फोन पे मेसेजव्दारे कपड्यांची लूट

**■मुंबई। प्रतिनिधी:**

झटपट श्रीमंतीसाठी व कमी कामामध्ये जादा पैसे मिळवण्यासाठी एका चोरट्याने यूट्यूबवर व्हिडीओ पाहून नाशिक शहरातील अनेक दुकानदारांना तब्बल दोन महिने बनावट यूपीआय पेड मेसेज दाखवून फसवत महागडे कपडे घेतल्याचे समोर आले आहे. चोरटा फोन पे अॅपचा बनावट पेड स्क्रीनशॉट तयार करून पैसे दिल्याचा भासवत होता. महागडे कपडे स्वस्तामध्ये विक्री करताना चोरट्यासह एका विधिसंघर्षित बालकास नाशिक शहर गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने ताब्यात घेतले.

दीपक परशुराम हांडोरे (वय २९, रा. बागुल नगर, विहीतगाव, ता. जि. नाशिक) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पथकाने दोघांच्या ताब्यातून मोबाईल फोन, लेडीज ड्रेस, साडया, लेडीज जीन्स व रोख रक्कम असा एकूण ५७ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

- चोरटा कपड्यांच्या दुकानात कपडे खरेदी करून फोन पे चा मेसेज व स्क्रीन शॉट पाठवून करायचा फसवणूक
- दोन महिन्यांपासून व्यापाऱ्यांची लूट
- पथकाने संशयित दीपक हांडोरे यास वालदेवी नदीवरील लोखंडी पुलाजवळ ताब्यात घेतले.
- हांडोरे याने मुंबई नाका, अंबड, नाशिकरोड पोलीस ठाणे हद्दीत दुकानातून कपडे चोरल्याची कबुली दिली.
- संशयित हांडोरे अशिक्षित व विवाहित आहे.

चोरट्याकडून कपड्यांच्या दुकानांमध्ये जाऊन कपडे खरेदी करून पैसे हे फोन पे माध्यमातून दिल्याचे भासवले जायचे. मात्र, बँक खात्यावर पैसे जमा होत नव्हते. याप्रकरणी व्यापाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केली होती. शहर गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने फसवणुकीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध सुरू केला. पथकाने कपड्यांच्या दुकानांमध्ये पाहणी करत सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले. प्रत्येक दुकानामध्ये एकाच युवकाच्या संशयास्पद हालचाली पथकाला दिसून आल्या. सहायक पोलीस उपनिरीक्षक गुलाब सोनार व हवालदार अतुल पाटील यांना बुधवारी (दि.१) दोन जण चोरीचे कपडे विक्रीसाठी वडनेर गेटजवळ असलेल्या वालदेवी नदीवरील लोखंडी पुलाजवळ उभे असल्याची माहिती मिळाली. ही बाब सोनार व



पाटील यांनी प्रभारी अधिकारी हेमंत तोडकर यांना सांगितली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचत दोघांना ताब्यात घेतले.

**अशी आहे मोड्स ऑपरेंडी**

संशयित हांडोरे दुकानात कपडे खरेदी करायचा. क्यूआर कोड घेण्याचा बहाणा करून तो फोटो काढायचा. रेंजची अडचण आहे असे सांगत तो दुकानाच्या दारात जाऊन मेसेज तयार करून पाठवायचा आणि बनावट फोन पे पेमेंटचा स्क्रीनशॉट दाखवयाचा. दुकानांमध्ये गर्दी असल्याने व्यापारी लक्ष देत नव्हते. त्याचा त्याने गैरफायदा घेण्यास सुरुवात केली.

**या कारणामुळे निवडला चोरीचा मार्ग**

हांडोरे आधी गावांमधील बाजारांमध्ये कपडे विक्री करायचा. त्यात त्याला यश आले नाही. झटपट पैसे कमविण्यासाठी हांडोरे यानेझटपट श्रीमंतीसाठी यूट्यूबवर व्हिडीओ पाहिले. त्यात त्याला एक ट्रिक मिळाली. फोन पे अॅप वापरून पेमेंट केल्याचा बनावट स्क्रीनशॉट काढण्यास सुरूवात केली.

**असा आला जाळयात**

दोन महिन्यांमध्ये अनेक दुकानांत कपडे घेतले जायचे पण पेमेंट बँक खात्यावर जमा होत नव्हते. ही बाब अनेक व्यापाऱ्यांच्या उशिरा लक्षात आली. यासंदर्भात व्यापाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. चोरटा दुकानांमधून चार हजार, पाच हजार, सात हजार व आठ हजार रूपयांमध्ये कपडे खरेदी करायचा. पोलीस तपासात प्रत्येक दुकानात एकच युवक दिसून आला. मात्र, बाहेर एक तरुण असल्याचेही निष्पन्न झाले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण व मानवी कौशल्याच्या आधारे चोरट्याला पकडले.

चोरट्यांना पकडल्यामुळे आगामी सण उत्सवाच्या काळात व्यापाऱ्यांची लूट होण्यापासून रोखण्यात गुन्हे शाखा युनिट दोन ला यश आले आहे. व्यापाऱ्यांनी सण उत्सवाचे काळात ऑनलाईन व्यवहार करताना दक्षता घ्यावी. बँक खात्यावर पैसे जमा झाल्याची खात्री करावी.

# धनगर समाजाच्या आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या

## पोलिसांना सापडली सुसाईड नोट, 'मुख्यमंत्रीसाहेब, माझं...'

**■संभाजीनगर। प्रतिनिधी:**

संभाजीनगरच्या तरुणाने धनगर समाजाला आरक्षण मिळावं यासाठी आत्महत्या केली असून, त्याने सुसाईड नोटमध्ये मुख्यमंत्र्यांचा उल्लेख केला आहे. धनगर समाजाच्या आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या, पोलिसांना सापडली सुसाईड नोट, 'मुख्यमंत्रीसाहेब, माझं...'

धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) संवर्गात आरक्षण देण्याच्या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. आत्महत्येपूर्वी तरुणाने लिहिलेली सुसाईड नोट पोलिसांना सापडली आहे. सुसाईड नोटमध्ये त्याने मुख्यमंत्र्यांचा उल्लेख केला आहे. त्याने मुख्यमंत्र्यांना आपले बलिदान वाया जाऊ न देण्याची



विनंती केली आहे. या घटनेमुळे धनगर समाजात संतापाची लाट उसळली आहे.

गोपीनाथ रघुनाथ दांगोडे असं आत्महत्या करणाऱ्या तरुणाचं नाव आहे. तो छत्रपती संभाजीनगरच्या फुलंब्री तालुक्यातील खामगाव गोरक्ष येथील अल्पभूधारक शेतकरी होता. त्याच्या पश्चात पत्न ी व ४ मुली असा परिवार आहे.

जालना शहरात धनगर आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे. पण सरकारने अद्याप त्याची योग्य ती दखल घेतली नाही. यामुळे गोपीनाथ दांगोडे हा मानसिक तणावात होता. मंगळवारी मध्यरात्री त्यांनी स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

**काय आहे सुसाईड नोटमध्ये?**

पोलिसांना मृतदेहाजवळ आढळलेल्या सुसाईड नोटमध्ये गोपीनाथ दांगोडे याने आपण धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यासाठी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख आहे.

''मी गोपीनाथ रघुनाथ दांगोडे, आम्हाला धनगर समाजास आरक्षण मिळत नाही. म्हणून मी बलिदान देत आहे. मुख्यमंत्री साहेब, माझे बलिदान वाया जाऊ देऊ नये. धनगर समाजाला एसटी आरक्षण मिळालेच पाहिजे,'' असं त्याने आपल्या सुसाईड नोटमध्ये म्हटले आहे.

# गॅस गँगच्या म्होरक्याला आश्रय, आर्थिक मदत... बिल्डरला अटक




**■मुंबई। प्रतिनिधी:**

इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाथर्डी रोड भागात झालेल्या राशिद खान खूनप्रकरणात फरार, मुख्य संशयिताला आर्थिक मदत व आश्रय देणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाला गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने सापळा रचून अटक केली. किस्मत अली आजम अली अन्सारी (३७, रा. सावरकर चौक, सिडको) असे संशयित बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाथर्डी रोडवरील राशिद खान खूनाच्या गुन्ह्यातील मुख्य संशयित गयासउद्दीन ऊर्फ गॅस व हासीम वारसी फरार होते. त्यांच्या शोध मोहिमेदरम्यान तपासात किस्मत अली हा संशयित आरोपीला पळून जाण्यास मदत करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यांचे अस्तित्व लपवण्यासाठी आर्थिक मदत व निवाऱ्याची सोय करून देत असल्याची माहिती समोर आली.

या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने सिडकोतील राणाप्रताप चौक परिसरात सापळा रचून किस्मत अलीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्हा घडल्यावर फरार संशयिताला आश्रय व आर्थिक मदत दिल्याची कबुलीही दिली. किस्मत अली हा बांधकाम व्यवसायिक असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com